। लातूर । वर्ष ३४ वे । अंक १८७ वा । बुधवार, दिनांक १५ ऑक्टोबर २०२५ । पृष्ठे ६ । किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)  कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

# प्रशांत किशोर यांची निवडणुकीतून माघार !

## या निर्णयामागील कारण काय?



**२०२५ बिहार निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एक मोठी बातमी समोर येत आहे. राजकीय रणनीतीकार म्हणून प्रसिद्ध असलेल्या प्रशांत किशोर यांनी निवडणुकीतून माघार घेण्याचा आपला निर्णय जाहीर केला आहे. पीटीआय वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी हा निर्णय जाहीर केला आहे. जन सुराज पक्षाचे संस्थापक प्रशांत किशोर यांनी बिहार विधानसभा निवडणूक लढवणार नसल्याचा निर्णय जाहीर केल्याने राजकीय चर्चांना उधाण आले आहे. प्रशांत किशोर नक्की काय म्हणाले? त्यांनी निवडणूक न लढवण्याचा निर्णय का घेतला?**

पीटीआय वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी पक्षाच्या व्यापक हितासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगितले. ते म्हणाले, मी निवडणूक लढवणार नाही. पक्षाने हा निर्णय घेतला आहे. मी पक्षात जे काम करीत आलो आहे, तेच सुरू ठेवणार. पक्षाच्या व्यापक हितासाठी मी संघटनात्मक काम करीत राहीन. ते पुढे म्हणाले, मी जर स्वतः निवडणुकीला उभा राहिलो, तर पक्षाच्या प्रचाराकडे दुर्लक्ष होऊ शकते. त्यातून पक्षसंघटनेच्या कामाला फटका बसेल. त्यामुळे पक्षहितासाठी हा निर्णय घेतला आहे.

प्रशांत किशोर यांनी म्हटले, जर बिहारमध्ये जनसुराज्य पक्षाचा विजय झाला, तर त्याचा राष्ट्रीय स्तरावर परिणाम होईल. मी आजवर अनेकदा पूर्ण खात्रीने सांगत आलो आहे की, माझ्या पक्षाला एक तर १५० हून अधिक जागा किंवा १० पेक्षाही कमी जागा मिळतील. याच्या अधेमधे इतर काही होण्याची शक्यता नाही. प्रशांत किशोर यांच्या पक्षाने आतापर्यंत उमेदवारांच्या तीन याद्या जाहीर केल्या आहेत.

प्रशांत किशोर यांनी जोर देऊन सांगितले की, त्यांनी स्वतः विधानसभा निवडणूक लढविण्याऐवजी संपूर्ण बिहारमध्ये जनसुराज्य पक्ष उभारण्यावर आणि मजबूत करण्यावर लक्ष केंद्रित करावे, असा सामूहिक निर्णय पक्षाने घेतला. एकंदरीत विचार केल्यास, एका जागेवरून निवडणूक लढवल्याने ते केवळ एका मतदारसंघापुरते मर्यादित झाले असते किंवा एकाच मतदारसंघावर जास्त लक्ष केंद्रित झाले असते. ही त्यांच्या पक्षाची पहिलीच निवडणूक आहे. अशा परिस्थितीत संपूर्ण प्रचार व्यवस्थित सांभाळणे आणि पक्षाची वाढ व कल्याण सुनिश्चित करणे कठीण झाले असते. अल्प काळात एकच जागा जिंकण्यापेक्षा दीर्घकालीन यशासाठी मजबूत संघटनात्मक पाया घालणे जनसुराज्य पक्षासाठी अधिक महत्त्वाचे असू शकते.

पक्षाने प्रशांत किशोर यांना राघोपूरसारख्या प्रतिष्ठित मतदारसंघातून (तेजस्वी यादव यांचा बालेकिल्ला) किंवा त्यांच्या जन्मस्थळ असलेल्या करगहर मतदारसंघातून उभे न करण्याचा निष्कर्ष काढला असावा. किशोर यांनी सांगितल्यानुसार, अशा जागांवरून त्यांनी निवडणूक लढवल्यास, त्यांचे पक्षाच्या प्रचारावरून लक्ष हटून, ते त्यांच्या एकट्या व्यक्तीवर अधिक केंद्रित झाले असते. त्यामुळेच पक्षाने या महत्त्वाच्या जागांसाठी इतर उमेदवारांची निवड केली आहे. उदाहरणार्थ- राघोपूरमध्ये तेजस्वी यादव यांचा सामना चंचल सिंह करणार आहेत.

प्रशांत किशोर म्हणाले, १५० पेक्षा कमी जागा म्हणजे जरी त्या जागा १२० किंवा १३० जरी असल्या तरी, तो माझ्यासाठी पराभव असेल. त्यांनी स्पष्ट केले की, १५० पेक्षा कमी जागा जिंकणे म्हणजे पराभव मानला जाईल. तर, चांगले यश मिळाल्यास पक्षाला बिहारमध्ये परिवर्तन करण्याची आणि देशातील प्रमुख राज्यांमध्ये त्यांचे स्थान सुधारण्याची संधी मिळू शकते. राज्यातील त्रिशंकू निकालाची शक्यता त्यांनी फेटाळून लावली आणि सांगितले की, अशी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाही. जर आम्ही चांगले प्रदर्शन केले नाही, तर त्याचा अर्थ लोकांनी आमच्यावर पुरेसा विश्वास दाखवला नाही. मात्र, असे झाले तरीही आम्ही रस्त्यावरील आणि समाजातील आमचे राजकारण पुढे चालू ठेवू, असे ते म्हणाले.

### जनसुराज्य पक्षाची पहिली निवडणूक

२०२५ ची बिहार निवडणूक प्रशांत किशोर यांच्या जनसुराज्य पक्षासाठी पहिली निवडणूक असेल आणि तीन वर्षांच्या पायाभरणीनंतर ही त्यांची पहिली खरी कसोटी असेल. किशोर यांच्या प्रयत्नांची सुरुवात पाच हजार गावांमधून केलेल्या पदयात्रेने झाली. या पदयात्रेत त्यांनी स्थानिक लोकांशी संपर्क साधला, तळागाळातील नेत्यांना ओळखले आणि लोकांशी जोडले जाईल, असे व्यासपीठ तयार केले. किशोर स्वतः निवडणूक लढवीत नसल्याने, या दीर्घकालीन प्रयत्नांचे मतदारांच्या पाठिंब्यात आणि विश्वासात यशस्वी रूपांतर झाले आहे की नाही, हे आता पक्षाच्या निवडणुकीतील कामगिरीवरून दिसून येईल.




दिवाळीमध्ये खाजगी बसचालकांनी जास्त भाडे आकारल्यास

# ऑनलाईन तक्रार करा

**लातूर/प्रतिनिधी :** दिवाळी सणानिमित्त राज्यभरातील नागरिक मोठ्या प्रमाणात गावी येत-जात असल्याने खाजगी प्रवासी बसेसची मागणी वाढली आहे. यानिमित्त काही खासगी बसचालकांकडून मनमानी भाडेवाढ आकारण्याची शक्यता आहे. प्रवाशांची लुबाडणूक होऊ नये, यासाठी राज्य शासनाने २७ एप्रिल २०१८ रोजी जारी निर्णयानुसार खाजगी कंत्राटी प्रवाशी वाहनांचे कमाल भाडेदर निश्चित केले आहेत. या भाडेदर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एमएसआरटीसी) समान प्रकारच्या बसेसच्या टप्पा वाहतूक प्रती किलोमीटर भाडेदरापेक्षा ५० टक्क्यांपेक्षा जास्त राहणार नाहीत.



या नियमानुसार वाजवीपेक्षा जास्त भाडे आकारणाऱ्या खासगी बस चालकांविरुद्ध नागरिकांनी लातूर प्रादेशिक परिवहन कार्यालाच्या rto.24mhgov.in या ई-मेलवर आपली तक्रार नोंदवावी. या तक्रारीमध्ये प्रवास कोठून कुठपर्यंत केला, तिकिटाची प्रत, वाहनाचा क्रमांक आदी तपशील नमूद करावा, असे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी आशिषकुमार अय्यर यांनी कळविले आहे.

### बाबासाहेब पाटलांचा गोंदियाच्या पालकमंत्रिपदाचा राजीनामा

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी गोंदियाच्या पालकमंत्रिपदाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी स्वतः याची पुष्टी केली आहे. त्यांच्या जागी आता राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्याकडे गोंदियाच्या पालकमंत्रिपदाची धूरा सोपवण्यात आल्याची माहिती आहे. पण तूर्त तरी त्याची अधिकृत पुष्टी झाली नाही. दरम्यान, बाबासाहेब पाटलांच्या राजीनाम्यामागे सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुल्ल पटेल यांच्या नाराजीचे कारण असल्याचा दावा केला जात आहे. बाबासाहेब पाटील यांनी गुडघ्याच्या शस्त्रक्रियेनंतर तब्येतीचा हवाला देत आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. सततचा लांबचा प्रवास आणि शारीरिक त्रास यामुळे कामकाजात अडथळा येत असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र, विरोधक आणि पक्षांतर्गत वर्तुळात यामागे राजकीय दडपण असल्याची कुजबूज आहे. माध्यमांशी बोलताना बाळासाहेब पाटील म्हणाले की, प्रफुल्ल पटेल यांनी सांगितले ते बरोबर आहे. आपण १५ ऑगस्ट, २६ जानेवारी व १ मे रोजी जातो, त्यानंतर दोन-तीन महिन्यातून एकदा जातो. परंतु, पटेल यांनी टीका केली म्हणून रागारागाने मी राजीनामा दिलेला नाही. मुळात राग यायचे कारण नाही. पालक मंत्रिपदावरून थोडी गैरसोय होते. परंतु, सगळंच काही मनासारखे होणार नाही. कारण राज्यात तीन पक्षांचे सरकार आहे.

नुकत्याच नागपूरमध्ये पार पडलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या मेळाव्यात प्रफुल्ल पटेल यांनी विदर्भातील पालक मंत्र्यांवर सडकून टीका केली होती.

विदर्भातील मंत्री फक्त १५ ऑगस्ट व २६ जानेवारीलाच जिल्ह्यात दिसतात, असे त्यांनी म्हणत, लोकप्रतिनिधींना वेळ न देणाऱ्या पालकमंत्र्यांची कार्यशैलीवर त्यांनी प्रश्न उपस्थित केला होता.

### घाटकोपरमध्ये भरदिवसा दर्शन ज्वेलर्सवर दरोडा, मालकावर चाकू हल्ला, हवेत गोळीबार!

**मुंबई/प्रतिनिधी :** घाटकोपर मधील अमृत नगर येथे 'दर्शन ज्वेलर्स'वर भर दिवसा झालेल्या दरोड्यामुळे खळबळ उडाली आहे. दुकानात घुसून मालक दर्शन मेटकरी यांच्यावर चाकूने हल्ला करण्यात आला. 'तीन दरोडेखोरांनी दुकानात प्रवेश करून मालकावर हल्ला केला आणि त्यानंतर हवेत गोळीबार करून दहशत निर्माण केली,' अशी माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली. या घटनेनंतर अपर पोलीस आयुक्त, डीसीपी आणि क्राईम ब्रांचची विविध पथके घटनास्थळी दाखल झाली आहेत. दिवाळीच्या तोंडावर वर्दळीच्या ठिकाणी झालेल्या या घटनेमुळे व्यापारी आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. पोलीस परिसरातील सर्व सीसीटीव्ही फुटेज तपासून आरोपींचा शोध घेत आहेत.

### पूरग्रस्त पशुपालकांसाठी लातूर जिल्हा प्रशासनाचा अभिनव उपक्रम; गमाविलेल्या पशुधनाच्या बदल्यात गोशाळांमधून जनावरांचे वाटप सुरू

**लातूर/प्रतिनिधी :** अतिवृष्टी व पूरपरिस्थितीमुळे जिल्ह्यात अनेक पशुपालकांचे मौल्यवान पशुधन मृत झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे पशुपालकांच्या उपजीविकेवर परिणाम झाला असून, त्यांना दिलासा देण्यासाठी लातूर जिल्हा प्रशासनाने एक अभिनव व संवेदनशील उपक्रम हाती घेतला आहे. पूर परिस्थितीत गमाविलेल्या पशुधनाच्या बदल्यात या उपक्रमाअंतर्गत जिल्ह्यातील विविध गोशाळांमधील गायी, बैल, कालवडी व गोऱ्हे हे पशुपालकांना देण्यात येत आहेत.

जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा पशुसंवर्धन विभागाच्या समन्वयातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. आपत्तीग्रस्त पशुपालकांना पुन्हा एकदा उत्पादनक्षम पशुधन उपलब्ध करून देऊन त्यांचे आर्थिक पुनर्वसन करणे, हा उपक्रमाचा उद्देश आहे. या उपक्रमांतर्गत उदगीर तालुक्यातील पूरग्रस्त शेतकऱ्यांना सोमनाथपूर येथील श्री गोरक्षण गोशाळेमार्फत एकूण १६ पशुधनांचे वाटप करण्यात आले आहे. हा उपक्रम जिल्ह्यातील इतर गोशाळांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे. आपले पशुधन गमाविलेल्या पूरग्रस्त भागातील पशुपालकांनी आपल्या संबंधित पशुवैद्यकीय संस्थेशी संपर्क साधावा. पात्र पशुपालकांची यादी तयार करून त्यांची पडताळणी केल्यानंतर जवळच्या गोशाळांशी समन्वय साधून जनावरांचे वाटप केले जात असल्याचे पशुसंवर्धन विभागाचे जिल्हा उपआयुक्त डॉ. श्रीधर शिंदे यांनी सांगितले.

पूरग्रस्त पशुपालकांचे जीवनमान उंचावण्यासाठी व त्यांना उपजीविकेचे साधन उपलब्ध करून देण्यासाठी हा उपक्रम राबविला जात आहे. गोशाळा ह्या समाजसेवेचे केंद्र आहेत आणि पुरामध्ये पशुधन गमाविलेल्या पशुपालकांना त्या आधार देत आहेत, ही आनंदाची बाब आहे, अशी भावना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी व्यक्त केली.

लातूर जिल्ह्यातील सर्व गोशाळांनी आपल्या संस्थेत उपलब्ध असलेल्या निरोगी गायी-बैलांची माहिती पशुसंवर्धन विभागास द्यावी, जेणेकरून अशा आपत्तीग्रस्त पशुपालकांना वेळेवर मदत मिळू शकेल, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. पूरग्रस्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित पशुवैद्यकीय दवाखाना, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन कार्यालय किंवा तालुका पशुधन विकास अधिकारी कार्यालयाशी त्वरित संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### लातूर जिल्ह्यात अकस्मात मृत्यूंच्या घटनांमध्ये बनावट चिठ्ठ्या तयार करणाऱ्यांविरुद्ध दोषारोपपत्र दाखल

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यात मागील काही दिवसांत जातीनिहाय आरक्षण, सरकारी नोकरी तसेच आर्थिक मोबदला मिळविण्यासाठी काही संशयितांनी अकस्मात मृत्यूंच्या घटनांचा फायदा घेत, पोलीस व शासनाला चुकीची माहिती देऊन शासनावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला होता. यासाठी त्यांनी बनावट चिठ्ठ्या तयार करून त्या मृत व्यक्तींनी लिहिल्याचे भासविले होते.

प्राथमिक तपासातील वैज्ञानिक पुरावे व विश्लेषणानुसार त्यांनी जाणीवपूर्वक बनावट दस्तऐवज तयार करून खोटी माहिती दिल्याचे स्पष्ट झाले. त्यानुसार जिल्ह्यातील खालील पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे नोंदविण्यात आले आहेत -

पोलीस ठाणे अहमदपूर - संभाजी ऊर्फ धनाजी शिंदगी (गु.र.नं. ६६८/२०२५)

२. पोलीस ठाणे निलंगा - माधव (गु.र.नं. २९५/२०२५)

३. पोलीस ठाणे चाकूर - शिवाजी रा. हणमंतवाडी तांडा, नरेंद्र रा. शिरनाळ तानाजी मधुकर जाधव, वय २५, रा. हणमंतवाडी तांडा (गु.र.नं. ५२९/२०२५)

वरील गुन्हे भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३३६(२),(३), ३४०(२), २२९(१), २९२(१), २१२(१), २१७(अ) अंतर्गत दाखल करण्यात आले असून संबंधितांना तीन ते सात वर्षांपर्यंत शिक्षा होऊ शकते.

तपास पोलीस निरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आला होता.

तपासी अधिकारी यांनी नमुद तीन्ही गुन्ह्यांचे मिळालेल्या वैज्ञानिक पुराव्या आधारे आणि इतर माहितीचे विश्लेषण करून, संबंधितांनी गुन्हा कसा केला या संबधी पुरावे गोळा करून, शास्त्रोक्त पध्दतीने तपास करण्यात आला आहे. तसेच तपासा दरम्यान तीन्ही गुन्ह्यातील संबंधितांनी गुन्हा केल्याचा कबुली जबाब दिलेला आहे. तपासादरम्यान नमूद आरोपितांविरूद्ध सबळ पुरावे मिळून आल्याने तीनही आरोपितांविरूद्ध मा. न्यायालयात आज दिनांक १४/१०/२०२५ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहेत.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



रस्त्यावर खड्ड्यामध्ये अपघात झाल्यास महानगरपालिकेने सहा लाख रुपये भरपाई द्यावी- SC

## चिमटा दयाचा



रस्त्याची गुणवत्ता
ढासळत आहे !
लातूर-टेंभुर्णी हा
पुरावा आहे !!
गुणवत्तेचे रखवालदार
दुर्लक्ष करीत आहेत !!

# प्रतिबंधित गुटख्याची अवैध विक्री व्यवसाय करणाऱ्या चार व्यक्ती विरोधात दोन गुन्हे दाखल

### आठ लाख ५४ हजाराचा मुद्देमाल जप्त.. पोलीस अधीक्षकांच्या विशेष पथकाची औसा येथे कारवाई

**लातूर/प्रतिनिधी :** प्रतिबंधित गुटख्याची अवैध विक्री व्यवसाय करणाऱ्या चार व्यक्ती विरोधात दोन गुन्हे दाखल केले असून त्यांच्याकडून आठ लाख ५४ हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून सदर कारवाई पोलीस अधीक्षकांच्या विशेष पथकाने औसा येथे केली.

याविषयी सविस्तर वृत्त असे की, पोलीस अधीक्षक श्री.अमोल तांबे यांनी अवैध धंद्यावर कार्यवाही करण्याकरिता पथकाची निर्मिती करून मोठ्या प्रमाणात अवैध धंद्यावर कारवाई करण्याचे सुचित केले आहे. त्या अनुषंगाने अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाचे पोलीस उपनिरीक्षक आयुब शेख यांचे मार्गदर्शनात दि.१३/१०/२०२५ रोजी पथकाला मिळालेल्या माहितीवरून औसा पोलीस ठाणे हद्दीत महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटखा व पान मसाल्याची अवैध विक्री व्यवसाय करणाऱ्या ठिकाणावर छापेमारी छापेमारी करण्यात आली.




सदर छापेमारीत खालील नमूद इसम हे महाराष्ट्र शासनाने विक्री, व्यवसाय, सेवन यासाठी प्रतिबंधित केलेले वेगवेगळ्या कंपनीचा गुटखा व पानमसाला बाळगलेले मिळून आले.

१) मारूफ , वय २५ वर्ष, राहणार समता नगर, औसा.
२) वसीम, वय २४ वर्ष, राहणार खडकपुरा गल्ली, औसा. असे असून त्यांना प्रतिबंधित गुटखा व पानमसाल्याच्या पुरवठा करणारे
३) मिनाज , राहणार समता नगर, औसा.
४) साजिद, राहणार कर्नाटक.

असे असून नमूद चारही आरोपी विरुद्ध पोलीस ठाणे औसा येथे ०२ गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यांच्याकडून एकूण ०८ लाख ५४ हजार ४९५ रुपयाचा गुटखा व पानमसाल्याचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यातील आरोपी अनुक्रमांक ०१ व ०२ यांना अटक करण्यात आली असून अनुक्रमांक ०३ व ०४ हे फरार असून त्यांना लवकरच नमूद गुन्ह्यात अटक करण्यात येणार आहे.

सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात विशेष पथकाचे पोलीस उपनिरीक्षक आयुब शेख यांच्या नेतृत्वातील पथकामधील श्रेणी पोलीस उपनिरीक्षक आयुब शेख, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक जाधव, पोलीस अमलदार युसुफ शेख, रामहरी भोसले, विशाल गुंडरे, घुगे, चामे यांनी केली आहे.

### लोक आंदोलन न्यासचा लोकशिक्षण आणि लोकजागृतीचा उपक्रम

पदाधिकाऱ्यांसाठी लातुरात प्रशिक्षणाचे आयोजन; न्यासचे प्रमुख पदाधिकारी राहणार उपस्थित

**लातूर/प्रतिनिधी :** समाजातील विविध प्रश्नांबाबत, शासनाच्या धोरणांबाबत आणि नागरी जबाबदाऱ्यांबाबत लोकांना सजग करणे, या उद्देशाने पद्मभूषण,पद्मश्री तथा ज्येष्ठ समाजसेवक अण्णासाहेब हजारे प्रणित राष्ट्रीय लोक आंदोलन न्यास या सामाजिक संघटनेच्या वतीने पदाधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षणाचा उपक्रम राबविण्यात येत आहे. लातूर जिल्ह्यातील पदाधिकारी आणि सदस्यांसाठी गुरुवारी (दि.१६ ऑक्टोबर) सकाळी अकरा वाजता प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी न्यासचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. यानंतर संघटनात्मक बांधणीच्या दृष्टीने एक बैठकही पार पडणार आहे.

या बैठकीस न्यासच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षा श्रीमती कल्पनाताई इनामदार, उपाध्यक्ष डॉ. कमल टावरी (माजी सनदी अधिकारी, भारत सरकार), खजिनदार दत्ता आवारे, विश्वस्त सुखदेवसिंह विक्र, दगडू मापारी, कार्यालयीन व्यवस्थापक अन्सार शेख आदींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत गुरुवारी (दि. १६) लातुरातील पत्रकार भवन येथे जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत प्रशिक्षण घेतलेले पदाधिकारी गावपातळीवर जाऊन नागरिकांना सजग करण्याचे काम करणार आहेत, अशी माहिती न्यासच्या वतीने देण्यात आली आहे. दरम्यान, यानंतर न्यासच्या संघटन बांधणीसाठी एक बैठक पार पडणार आहे. यावेळी जिल्ह्यातील न्यासच्या पदाधिकारी आणि सदस्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन लोक आंदोलन न्यासच्या जिल्हा पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## कोण कोणासोबत जाईल सांगणे कठिण..

राज्यात आगामी काळात लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होणार आहेत. त्याची पुर्व तयारी झाली आहे. त्यामुळे नगरपालिका, महानगरपालिका व जिल्हा परिषदाबरोबर सर्वांचे लक्ष असलेली मुंबई महानगरपालिकेची निवडणुकीकडे लक्ष लागणार आहे. राज्यात सर्वाधिक उत्स्युकतेची बाब म्हणजे, मनसे राज ठाकरे याचां पक्ष उद्धव ठाकरे यांच्या सोबत जाणार का? मुंबई महानगरपालिकेत एकतर्फी सत्ता उद्धव ठाकरे यांना हवी आहे. दोन ठाकरे बंधु एकत्र आल्यास ते शक्य होऊ शकेल असा विचार समोर येत आहे. उद्धव ठाकरे हे महाविकास आघाडीसोबत आहेत. या शरद पवार सह राहुल गांधी म्हणजे कॉंग्रेस असणार आहे. उद्धव ठाकरे हे कॉंग्रेस व शरद पवार यांच्या राष्ट्रवादी सोबत आहेत. चौथा पक्ष मनसे सोबत आल्यास महायुतीस रोखणे शक्य होईल असे गणित संजय राऊत यांचे असू शकेल. मुळात मनसे सोबत येणार असे वक्तव्य मनसेकडून होणे अपेक्षित असताना उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेकडून राऊत बोलत आहेत. याचा परिणाम काय होत असेल तर मनसेचे कार्यकर्ते नाराजी व्यक्त करीत असतील. दोन ठाकरे बंधू एकत्र येणे आवश्यक आहे. महाआघाडीत कॉंग्रेस आहे. हे राज ठाकरे यांना चालले का? ज्या ठाकरे परिवारांनी कॉंग्रेसचा सतत विरोध केला. कदापी जमऊन घेतले नाही. त्यांच्या सोबत उद्धव ठाकरे गेले मात्र राज ठाकरे जातील का? किंवा जुळऊन घेतील का? कॉंग्रेसचा विचार राज ठाकरे यांना पटेल का? असे विविध बाब समोर येते. दोघे भाऊ एकत्र येऊन लढले तर निश्चित फायदा होऊ शकेल, मात्र कॉंग्रेस व शरद पवार यांची विचारसरणी राज ठाकरे यांना पटेल का? हा विचार करायाला लावणारा प्रश्न आहे. त्यामुळे मनसे महा आघाडी सोबत जातील असे वाटत नाही. तसे पाहिले तर राजकारणात काही खरे नसते. नुसते लबाड राजकारण असते. अशा लबाड राजकारणात सत्य ही असत्य होते. त्यामुळे अंदाज बांधणे शक्य नाही. सध्याला भाजपासोबत राष्ट्रवादी अजित पवार जातील का? हे स्वप्नात देखिल वाटले नव्हते. सकाळची शपथविधी समोर येते. त्यामुळे राजकारणात कधी काय होईल हे सांगता येत नाही. अजित पवार यांनी काकाची साथ सोडली. मनसे उद्धव ठाकरे यांच्यापासून दूर झाले. हिंदुह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे कडवे हिंदुत्व विसरली गेली. त्याचा परिणाम काय झाला तर आज उद्धजींची राजकिय स्थिती समाधानाची नाही. अजूनही खोके म्हणून संबोधतात. ज्यांना खोके म्हणता तेच एकेकारी आपले शिलेदार होते. आपले कट्टर समर्थक होते याचा विसर पडतो. वास्तविक जे दूर केले त्यांना परत बोलविले पाहिजे. जसे राज ठाकरे दूर गेले होते आता त्यांना परिस्थितीमुळे परत समाऊन घेतले जात आहे. आज परिस्थिती काय दर्शविते तर दोन बंधू एकत्र यावेत, बंधू एकत्र येतील मात्र कार्यकर्त्यांचे पुन्हा मने जोडतील का? याचा विचार केला पाहिजे. राजकारण कधी खरे असते असे नाही. तरी राजकारणारत वेळ व परिस्थितीपाहून निर्णय घ्यावे लागतात. एकेकाळी मुख्यमंत्री असलेले उपमुख्यमंत्री बनले आहेत. राजकिय परिस्थितीनुसार चालावे लागते. आज जरी मनसे महाविकास आघाडी गेल्यावर काय स्थिती होईल याचा अंदाज राज ठाकरे यांना आला असेल त्यामुळे त्यांनी कोणासोबत मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीपुर्वी जायचे हे जाहीर केले नाही. केवळ बंधुप्रेमापोटी भेटी घेत आहेत. कार्यकर्त्यात संभ्रम निर्माण झाला आहे. स्पष्टता अजून दिसून आली नाही. राजकारणात अचानक काही बाबी घडून घेतात. एकनाथ शिंदे कधी आक्रमक होतील असे वाटले नव्हते. त्यांनी एकमेव ठपका ठेवला ते म्हणजे हिंदुत्व सोडले असल्याने आम्ही त्यांना सोडले. एकनाथ शिंदे यांना जरी सत्ताधाऱ्याचा पाठींबा असले तरी जे शिंदे गटाने धाडस केले हे महत्वाचे आहे. आज कोणी कोणात्या पक्षात जाईल व कोणता झेंडा हाती घेईल हे सांगता येत नाही. परिस्थितीती अशी आहे की, ध्येयनिष्ठता राहीली नाही. पक्ष कार्य म्हणून ज्यावेळी पाहिले जाते त्यावेळी पक्षनिष्ठा समोर ठेऊन चालले पाहिजे. आज ठाकरे बंधू यांचे दोन भिन्न पक्ष आहेत. शिवसेना उद्धव ठाकरे पक्ष यांचा आहे. तर मनसे हा राज ठाकरे यांचा पक्ष आहे राज्यात जशी स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणुक पाहाता सत्ताधाऱ्यांना मुंबई महानगर पालिकेची निवडणुक महत्वाची आहे. भाजपाला कोणत्याही परिस्थितीत बीएमसी आपल्या ताब्यात राहावी हा दृष्टिकोन असणार आहे. तशी वाटचाल सुरु आहे. एकनाथ शिंदे हे मुंबईचे असल्याने व त्यांचे कार्य मुंबईत चांगले आहे. त्यामुळे त्यांचे काही प्रमाणात वजन आहे. मुख्यमंत्री यांचे मुंबई बरोबर नागपूरात वजन आहे. त्यामुळे त्यांच्यावर मोठी जबाबदारी आहे. एकतर राज्यात पावसाने पूरजन्य स्थिती निर्माण झाल्याने शेतकरी संकटात आहेत. पीके हाताची गेली. जमीनीतील माती वाहून गेली. जनावरे मरण पावली अशा स्थितीत दिवाळीसण कसा साजरा करावा असा प्रश्न आहे. त्याच प्रमाणे आता पंचायत समिती, नगरपरिषद बरोबर महानगर पालिकेच्या निवडणुक प्रक्रिया सुरु आहेत. आता यानिवडणुकीकडे जनतेचे लक्ष लागणार आहे. त्यामुळे संकटाची तिव्रता आपोआप कमी होण्याची शक्यता आहे. हा योग का चाल! हा संशोधनाचा विषय आहे. यात न जाता आलेल्या परिस्थितीचा मुकाबला करण्याची तयारी ठेवणे हेच ध्येय ठेवुन वाटचाल करावी लागणार आहे. राजकारण हे गजकर्णासारखे असते. एकदा का राजकारणी बनला की, त्याला मागचे, पुढचे सुधारत नाही. ही एक वस्तूस्थिती असून, मानसिकता आहे. त्यामुळे राजकारण खरे असते असे समजणे योग्य ठरणारे नाही. काळ व वेळ पाहून याची वाटचाल असते हे मात्र लक्षात ठेवले पाहिजे. राजकारणात उद्धवजी कॉंग्रेससोबत जातील, त्यात शरद पवार असतील व सरकार बनवतील असे वाटले नव्हते. शिवसेना ही कट्टर हिंदुत्वादी समजली जाते. त्यात बाळासाहेब ठाकरे हे कट्टर हिंदुत्वादी विचाराचे होते. ते मोठ्या पदाचे लालची नव्हते. ते सहज पंतप्रधान काय राष्ट्रपती बनले असते, मात्र ते तत्त्वाची मंडळी असतात ते तडतोड करीत नाहीत. तसा गुण इतर कोण्या राजकारण्याच्या अंगी येईल असे वाटत नाही. बाकीचे मात्र तडजोडीचे राजकारण करतात. त्यामुळे राजकारणातील पातळी घसरत आहे हे उघड आहे.

# पांढरी काठी : दृष्टिहीनांच्या आत्मविश्वासाचा प्रकाशमार्ग



जगात डोळे हे ज्ञानाचे, अनुभूतीचे आणि ओळखीसाठीचे सर्वात सामर्थ्यवान माध्यम मानले जाते. परंतु या डोळ्यांशिवायही अनेक व्यक्ती जग पाहतात ते मनाच्या डोळ्यांनी, संवेदनांच्या माध्यमातून, अनुभवाच्या प्रकाशातून. या अशा दृष्टिहीन व्यक्तींच्या स्वावलंबनाचे, सन्मानाचे आणि सामाजिक समानतेच्या अधिकाराचे प्रतीक म्हणजे पांढरी काठी होय. म्हणूनच दरवर्षी १५ ऑक्टोबर हा दिवस 'जागतिक पांढरी काठी दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ दृष्टिहीनांच्या सन्मानाचा नाही, तर समाजातील प्रत्येक व्यक्तीने त्यांच्या स्वातंत्र्यपूर्ण जीवनाचा आदर करावा, याची आठवण करून देणारा आहे.

पांढऱ्या काठीचा इतिहास विसाव्या शतकाच्या आरंभीचा आहे. १९२१ मध्ये, इंग्लंडमधील ब्रिस्टॉल शहरातील छायाचित्रकार जेम्स बिग्स यांनी अपघातामुळे दृष्टी गमावली आणि रस्त्यावर सुरक्षितपणे चालण्यासाठी आपल्या चालण्याच्या काठीला पांढरे रंग लावले, ज्यामुळे ती वाहनचालकांना दिसू शकली. १९३१ मध्ये, फ्रान्समधील गिल्ली दहर्बेमॉंट यांनी पांढऱ्या काठीचा वापर दृष्टिहीनांसाठी सुरू केला. १९३१ मध्ये पॅरिसमध्ये झालेल्या एका समारंभात त्यांनी दोन पांढऱ्या काठी दृष्टिहीनांना दिल्या, ज्यात एक अंध सैनिक आणि एक अंध नागरीक होते. यानंतर ५,००० पांढऱ्या काठी फ्रान्समधील अंध सैनिक आणि नागरिकांना वितरित करण्यात आल्या. या घटनांमुळे पांढरी काठी दृष्टिहीनांसाठी एक महत्त्वपूर्ण चिन्ह बनली, ज्यामुळे त्यांची सुरक्षितता आणि स्वातंत्र्य सुनिश्चित करण्यात मदत झाली. या काठीचा रंग पांढरा ठरविण्यामागे एक समाजशास्त्रीय विचार होता तो म्हणजे पांढरा रंग म्हणजे प्रकाश, शांती, सन्मान आणि दृष्टीचे प्रतीक होय. हा रंग इतर वाहनचालकांना किंवा नागरिकांना दृष्टिहीन व्यक्ती असल्याची ओळख देतो. १९६४ साली अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष लिंडन बी. जॉन्सन यांनी अधिकृतरीत्या १५ ऑक्टोबर हा म्हणून जाहीर केला. पुढे तो दिवस आंतरराष्ट्रीय पातळीवर म्हणून साजरा होऊ लागला. आज या दिवशी जगभरातील संस्था, सरकारे आणि स्वयंसेवी संघटना दृष्टिहीनांच्या स्वावलंबनासाठी कार्य करणाऱ्या उपक्रमांचे आयोजन करतात.

पांढरी काठी ही केवळ चालण्याचे साधन नाही, ती स्वाभिमानाचे प्रतीक आहे. दृष्टिहीन व्यक्तीला आपल्या आजूबाजूच्या वातावरणाची जाणीव करून देणारी ही काठी त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. काठीच्या साहाय्याने ते रस्त्यांवर सुरक्षितपणे चालू शकतात, अडथळे ओळखू शकतात, दिशांचा अंदाज घेऊ शकतात. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले, तर पांढरी काठी ही 'स्वावलंबनाचे' आणि 'समानतेचे' प्रतीक आहे. दृष्टिहीन व्यक्तीला मदतीवर अवलंबून राहावे लागत नाही, तर तो स्वतःच्या सामर्थ्याने समाजात मुक्तपणे वावरतो. हीच खरी 'दृष्टी' आहे त्यांच्यामध्ये आत्मविश्वासाची, स्वातंत्र्याची आणि मानवी प्रतिष्ठेची.

जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार, जगभरात सुमारे २८५ दशलक्ष लोक काही ना काही प्रकारच्या दृक्‌दोषाने ग्रस्त आहेत, त्यापैकी अनेक लोक पूर्णतः दृष्टिहीन आहेत. भारतातही दृक्‌दोषाचे प्रमाण चिंताजनक असून, अनेक लाख लोक विविध प्रकारच्या दृष्टिदोषाने प्रभावित आहेत. या परिस्थितीवर लक्ष केंद्रीत करण्यासाठी सरकार आणि स्वयंसेवी संस्था नेत्रदान, मोफत शस्त्रक्रिया, शिक्षण व रोजगार यासारख्या उपक्रमांद्वारे उपाययोजना करत आहेत. ग्रामीण भारतात अंधत्वाचे प्रमाण अधिक आहे, कारण आरोग्य सुविधा, जागरूकता आणि नेत्रोपचार या क्षेत्रांमध्ये अजूनही मोठी दरी आहे. राष्ट्रीय अंधत्व निर्मूलन कार्यक्रम अंतर्गत भारत सरकारने अनेक प्रयत्न सुरू केले आहेत. नेत्रदानाचे अभियान, मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरे, दृष्टिहीनांसाठी शिक्षण व रोजगारसंधी यावर लक्ष केंद्रीत केले जात आहे. परंतु समाजाच्या मानसिकतेत बदल घडविणे हे सर्वात मोठे आव्हान आहे.

आजचा काळ माहिती आणि तंत्रज्ञानाचा आहे, आणि या क्षेत्रात दृष्टिहीनांसाठी संधीचे नवे दरवाजे उघडले आहेत. ब्रेल लिपी, स्क्रीन रीडर सॉफ्टवेअर, टॉकिंग बुक्स, ऑडिओ-लायब्ररीज, ॲप-बेस्ड नेव्हिगेशन सिस्टम्स यामुळे दृष्टिहीन व्यक्ती आता शिक्षण, व्यवसाय, प्रशासन, संगणकशास्त्र, संगीत, कला, पत्रकारिता अशा अनेक क्षेत्रांत पुढे जात आहेत. भारतातील नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर द एम्पॉवरमेंट ऑफ पर्सन्स विथ व्हिज्युअल डिसॅबिलिटीज, देहरादून हे संस्थान दृष्टिहीनांसाठी प्रशिक्षण, संशोधन व मार्गदर्शन पुरविते. महाराष्ट्रात हेलन केलर इन्स्टिट्यूट फॉर ब्लाइंड, नाशिक ब्लाइंड स्कूल, पुण्यातील नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड अशा संस्था दृष्टिहीनांच्या शिक्षणासाठी आणि सामाजिक समावेशनासाठी कार्यरत आहेत.

'पांढरी काठी' ही अनेक देशांत कायद्याने मान्यता प्राप्त आहे. भारतात , २०१६ अंतर्गत दृष्टिहीन व्यक्तींना शिक्षण, रोजगार, वाहतूक, सार्वजनिक सुविधा आणि मतदानाचा समान अधिकार दिला आहे. सार्वजनिक ठिकाणी ब्रेल संकेत, साउंड सिग्नल्स, स्पर्शवाचक नकाशे, आणि सुरक्षित पादचारी मार्ग या सुविधा पुरविणे ही सरकारची जबाबदारी ठरविण्यात आली आहे. पांढरी काठी वापरणाऱ्या व्यक्तींचा सन्मान राखणे हे केवळ कायदेशीर नव्हे, तर नैतिक कर्तव्य आहे. पादचारी किंवा वाहनचालकांनी रस्त्यावर पांढरी काठी पाहिली, तर त्यांनी थांबून त्या व्यक्तीला सुरक्षित मार्ग द्यावा, हा ' ' चा मूलभूत नियम आहे.

समाजातील अंधश्रद्धा आणि पूर्वग्रह हे दृष्टिहीनांच्या प्रगतीसमोरील सर्वात मोठे अडथळे आहेत. 'अंधत्व म्हणजे अपंगत्व नव्हे', हे जनमानसात रुजविणे आवश्यक आहे. दृष्टिहीन व्यक्ती आपल्या संवेदना, बुध्दी आणि प्रतिभेच्या जोरावर समाजाचे महत्त्वाचे घटक ठरू शकतात, हे अनेक उदाहरणांनी सिद्ध केले आहे. जगप्रसिद्ध पियानिस्ट रे चार्ल्स, गायिका स्टीव्ही वंडर, भारतातील डॉ. बेनजामिन दोरिसवामी किंवा दीपक महालांकर यांसारख्या व्यक्तींनी अंधत्वावर मात करून जीवनाचे नवे आदर्श निर्माण केले. हे सर्व दाखवून देतात की काठीचा रंग पांढरा असला तरी त्या मागचा आत्मविश्वास मात्र तेजस्वी आहे.

जागतिक पांढरी काठी दिन हा केवळ स्मरणदिन नाही; तो एक जागरूकता चळवळ आहे. या दिवशी शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था आणि शासन विविध उपक्रमांद्वारे जनजागृती करतात. जसे की दृष्टिहीनांसाठी वॉकाथॉन, पांढऱ्या काठीच्या रॅली, सार्वजनिक परिसंवाद, कार्यशाळा आणि प्रेरणादायी कार्यक्रम. याचा हेतू समाजाला सांगणे हा आहे की दृष्टिहीन व्यक्ती दया किंवा सहानुभूतीच्या नाही, तर सन्मानाच्या पात्र आहेत.

शेवटी, पांढरी काठी ही अंधत्वाचे प्रतीक नाही, तर मानवी दृढनिश्चयाचे प्रतीक आहे. ती अंधारातही आशेचा दिवा प्रज्वलित करते, निर्बंधांना आव्हान देते आणि प्रत्येक दृष्टिहीन व्यक्तीला स्वतःच्या सामर्थ्यावर चालण्याची प्रेरणा देते. जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात, प्रत्येक रस्त्यावर, प्रत्येक मनात जर आपण पांढऱ्या काठीला सन्मानाने वाव दिला, तर ते समाज म्हणून आपल्या प्रगल्भतेचे द्योतक ठरेल. जागतिक पांढरी काठी दिन हा आपल्याला शिकवतो की दृष्टी फक्त डोळ्यांत नसते; ती मनात, आत्म्यात आणि माणुसकीत असते. म्हणूनच या १५ ऑक्टोबरला, पांढऱ्या काठीचा सन्मान करा, दृष्टिहीनांच्या हक्कांचा आदर करा आणि समाजात 'दृष्टी' म्हणजेच 'संवेदना' हा खरा प्रकाश आहे, ही जाणीव पसरवा.



**डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**मो. क्र. ९९६०१०३५८२**

# पातळ केस होतील दाट, आयुर्वेदातील हे ३ उपचार आहेत फायदेशीर! जाणून घ्या तज्ज्ञांकडून



आजकाल खराब जीवनशैलीमुळे केस गळणे, कोंडा होणे, पांढरे होणे अशा समस्या उद्भवत आहेत. केसांशी संबंधित अशा अनेक समस्या तरुणांमध्ये दिसून येत आहेत. या समस्या केवळ आपल्या सौंदर्यावरच परिणाम करत नाहीत, तर आपल्या आत्मविश्वासावरही परिणाम करतात. तथापि, केस गळण्याची मुख्य कारणे हार्मोनल बदल, तणाव आणि आहाराचा अभाव आहे.

दाट केस येण्यासाठी लोक अनेक महागडी उत्पादने वापरतात. काही जण रासायनिक उपचारही घेतात. तथापि, कधीकधी या उत्पादनांचे दुष्परिणाम देखील दिसून येतात. आयुर्वेद तज्ज्ञ सांगतात की केसांची वाढ होण्यासाठी काही आयुर्वेदिक उपाय खूप फायदेशीर आहेत. चला जाणून घेऊया आयुर्वेदाच्या या सोप्या टिप्सबद्दल

शिरोधारा

शिरोधारा ही पारंपारिक आयुर्वेदिक उपचार पद्धती आहे. यामध्ये हळूहळू कपाळाला तेल लावले जाते. ताणतणाव कमी करण्यासोबतच केसांची मुळेही मजबूत होतात. मात्र, हे उपचार आयुर्वेद तज्ञाच्या देखरेखीखालीच करा. ज्या लोकांचे केस तणावामुळे गळतात, त्यांच्यासाठी हे खूप फायदेशीर आहे.

शिरो अभ्यंग

म्हणजे डोक्याला मालिश करणे. भृंगराज आणि आवळा यांसारख्या हर्बल तेलांनी डोक्याला मसाज केल्यास खूप फायदा होईल. यामुळे केसांना पोषण मिळते आणि मुळे मजबूत होतात. केसगळती नियंत्रित करण्यासाठी आठवड्यातून दोनदा भृंगराज किंवा आवळा तेलाने डोक्याला हलक्या हाताने मसाज करा.

नस्य कर्म

हा नाकासंबंधित उपचार आहेत. यामध्ये अणु तेलाचा वापर केला जातो. नस्य शरीरातील दोष संतुलित करण्यास मदत करते. यामुळे केसही चांगले होतात. आयुर्वेद तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार रोज सकाळी नाकात अणु तेलाचे २ ते ३ थेंब टाका. यामुळे केसांच्या मुळांना पोषण मिळते.

यासोबतच व्हिटॅमिन बी१२ आणि डीशी संबंधित गोष्टींचा आहारात समावेश करावा. केस मजबूत ठेवण्यासाठी या दोन्ही गोष्टी आवश्यक आहेत.

# रात्री झोपण्यापूर्वी या पाच सवयी लक्षात ठेवा; १५ दिवसांत वजन होईल कमी

आजची लाइफस्टाइल आणि खाण्या-पिण्याच्या चुकीच्या सवयीमुळं अनेकांमध्ये लठ्ठपणाची समस्या तीव्र होत जात आहे. वजन कमी करण्यासाठी डायटिंग आणि व्यायामाचा आधार केला जातो. मात्र, अनेकदा डाएट आणि रोज व्यायाम करुनही वजन हवं तस कमी होत नाही. याचाच अर्थ तुमच्या वेट लॉस जर्नीमध्ये काही कमतरता आहे. पण काळजी करु नका रोज रात्री झोपताना काही गोष्टी लक्षात ठेवा. त्यामुळं तुम्ही झपाट्याने वजन कमी करु शकता.

रोज रात्री हे रुटीन करा फॉलो

वजन कमी करण्यासाठी रोज रात्री एक रुटीन फॉलो करा. जवळपास १५ दिवस हेच रुटिन फॉलो करा.

७ नंतर जेवण करणे टाळा

जर तुम्हाला वजन कमी करायचे आहे तर रात्री ७ वाजल्यानंतर चुकूनही जेवण करु नका. रात्री उशीरा जेवल्यानंतर जेवण पचवता येत नाही आणि लठ्ठपणा वाढतो. त्यामुळं आजच सातच्या आत जेवणाची सवय लावून घ्या. यामुळं तुमच्या वजनातही झपाट्याने बदल घडेल.

फायबरयुक्त पदार्थ खा

रात्रीच्या जेवणात नेहमीच लाइट आणि हेल्दी जेवण जेवले पाहिजे. फायबरयुक्त पदार्थ तुमच्या आहारात समाविष्ट करा. त्यामुळं रात्रीच्या जेवणात सलाड, सूप, डाळ, चपाती यांचा समावेश करा. यामुळं तुमचं पोट भरल्यासारखं राहिल आणि वजनही वाढणार नाही.

गरम पाणी पिण्याची सवय

तुम्हाला वजन कमी करायचे आहे तर जेवून झाल्यानंतर गरम पाणी प्या. त्यामुळं आरामात जेवण पचते आणि वजन कमी होण्यास मदत होते.

पुरेशी झोप घेणे गरजेचे

झोप पूर्ण न होणे आणि लठ्ठपणा याचा थेट संबंध आहे. जर तुम्हाला वजन कमी करायचे आहे. तर रोज पुरेशी झोप घ्या. रोज आठ तास झोप घेणे आवश्यक आहे.

हळदीचे दूध

वजन कमी करण्यासाठी हळदीचे दूध खूप फायदेशीर आहे. हळदीच्या दूधामुळं रोगप्रतिकारशक्ती वाढते. त्या मुळं आजपासूनच हळदीचे दूध पिण्याची सवय लावून घ्या.

# मेणासारखी वितळेल चरबी, फक्त सकाळी उपाशी पोटी घ्या हे ५ शॉट



वजन कमी करणे हा मुलांचा खेळ नाही. ते जितक्या वेगाने वाढते तितके कमी करण्यासाठी तिप्पट प्रयत्न करावे लागतात. वजन कमी करण्यासाठी लोक काय करत नाहीत जिमिंग आणि डाएटिंग सतत चालू राहते. एवढी धडपड करूनही तुमचे वजन कमी होत नसेल, तर सकाळीच शॉटस प्यायला सुरुवात करा. फटके नैसर्गिक घटकांनी समृद्ध असतात, जे वजन कमी करण्यास मदत करतात.

या शॉटसच्या सेवनाने चयापचय वाढण्यास, योग्य पचन राखण्यास आणि वजन कमी करण्यास मदत होते. हे वेलनेस शॉटस भरपूर पोषक असतात, जे चरबी जाळण्यात मदत करतात. येथे पाच वेलनेस शॉट पाककृती आहेत ज्या तयार करणे खूप सोपे आहे. हे लक्षात ठेवा की एखाद्याने रिकाम्या पोटी किंवा मोठ्या प्रमाणात हे शॉटस घेणे टाळावे. अन्यथा, त्याचे फार लवकर विपरीत परिणाम होऊ शकतात.

ऍप्पल शॉट

ऍपल सायडर व्हिनेगर शॉट वजन कमी करण्याचा एक चांगला मार्ग आहे. हे करण्यासाठी, एक लहान काचेचा शॉट घ्या. नंतर एक चमचा कच्चे, फिल्टर न केलेले सफरचंद सायडर व्हिनेगर घ्या आणि त्यात समान प्रमाणात ताजे पिळून काढलेला लिंबाचा रस घाला. चांगले हलवा आणि पटकन प्या. ऍपल सायडर व्हिनेगर चयापचय वाढवण्यासाठी आणि भूक कमी करण्यासाठी ओळखले जाते, तर लिंबू व्हिटॅमिन सीचा उत्कृष्ट स्रोत आहे. त्यात चरबी साठवून ठेवणारे हार्मोन्स नियंत्रित करण्याची क्षमता असते.

हा शॉट बनवण्यासाठी ताजे सोललेले आले घ्या. नंतर त्यात हळदीचे तुकडे, अर्ध्या लिंबाचा रस, चिमूटभर काळी मिरी आणि अर्धा चमचा कच्चा मध घाला. पिण्याआधी मिश्रण गाळून सेवन करा. आम्ही तुम्हाला सांगतो की आले आणि हळदीमध्ये दाहक-विरोधी गुणधर्म असतात, ज्यामुळे अन्न पचण्याची प्रक्रिया सुलभ होते आणि वजनही लवकर कमी होते.

ग्रीन टी शॉट

हा एक अतिशय मजेदार शॉट आहे. हे करण्यासाठी ग्रीन टी बॅग गरम पाण्यात बुडवून थंड होऊ द्या. ते थंड झाल्यावर त्यात चिमूटभर लाल मिरची टाकून नीट ढवळून घ्यावे. तुम्ही हा शॉट तुमच्या जेवणापूर्वी किंवा जेवणासोबत पिऊ शकता. ग्रीन टीमध्ये असलेले अँटिऑक्सिडंट फॅट खूप जलद बर्न करतात. तर लाल मिरचीतील कॅप्सेसिन घटक भूक कमी करून वजन कमी करण्यास मदत करते.

एलोवेरा शॉट

जवळपास प्रत्येकाच्या घरात कोरफडीचे रोप असते. अशा परिस्थितीत तुम्हाला हा शॉट बनवताना कोणतीही अडचण येणार नाही. यासाठी कोरफडीच्या ताज्या पानातून जेल काढा आणि त्यात एका लिंबाच्या रसात मिसळा. गुळगुळीत होईपर्यंत मिसळा आणि प्या. खरं तर, कोरफडमध्ये असे संयुगे असतात, जे वजन वाढण्यास प्रतिबंध करतात. लिंबूमध्ये आढळणारे व्हिटॅमिन सी पाचन तंत्र स्वच्छ करण्यास मदत करते.

व्हीटग्रास शॉट

एक चमचा ग्राउंड व्हीटग्रास पावडर एक कप पाण्यात मिसळून तुम्ही निरोगी आणि शक्तिशाली शॉट तयार करू शकता. चांगले मिसळले की हे मिश्रण गाळून प्या. सकाळी लवकर उठल्यानंतर हे नियमितपणे प्यायल्याने वजन झपाट्याने कमी होते.

# गोकर्ण वनस्पतीचा काढा ठरतोय प्रभावी



सध्याच्या बदलत्या हवामानामुळे अनेकांना वारंवार सर्दी, खोकला, अंग दुखणे आणि ताप याचा त्रास होतो. पावसाळा, हिवाळा आणि अगदी उन्हाळ्यात सुद्धा वातावरणातील बदलांमुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती कमी होते आणि आजार पटकन जडतो. विशेषतः वारंवार येणाऱ्या तापामुळे शरीर थकते, कामात अडथळा येतो आणि औषधांवर अवलंबित्व वाढतं.
यावर बहुतांश लोक तात्पुरता उपाय म्हणून तापाच्या गोळ्या, अँटीबायोटिक्स किंवा इतर औषधांचा वापर करतात. मात्र ही औषधं वारंवार घेतली तर त्याचे दुष्परिणामही होऊ शकतात. काही लोकांना या औषधांचा प्रभाव तात्पुरता वाटतो, आणि ताप परत परत येत राहतो. अशावेळी आयुर्वेदात दिलेले नैसर्गिक उपाय अधिक प्रभावी आणि आरोग्यदायी ठरू शकतात.
गोकर्ण (–रीरक्षळींर) – एक उपयुक्त औषधी वनस्पती
आयुर्वेदात गोकर्ण, ज्याला अपराजिता असंही म्हटलं जातं, ही एक अत्यंत उपयुक्त आणि बहुगुणी औषधी वनस्पती मानली जाते. निळ्या किंवा पांढऱ्या फुलांची ही वेल स्वरूपात आढळणारी वनस्पती विविध आजारांवर फायदेशीर मानली जाते.
गोकर्णच्या मुळांचा काढा तयार करून घेतल्यास वारंवार येणाऱ्या तापावर प्रभावी नियंत्रण मिळवता येते. हा काढा शरीरातील उष्णता नियंत्रित करतो, प्रतिकारशक्ती वाढवतो आणि ताप पुन्हा पुन्हा येण्याची शक्यता कमी करतो.
गोकर्णचे इतर आरोग्यदायी फायदे
१. मासिक पाळीतील त्रास: हा रस घेतल्यास मासिक पाळीतील अस्वस्थता कमी होते आणि हार्मोनल संतुलन सुधारते.२. बुद्धी आणि एकाग्रता वाढवते: गोकर्णाच्या फुलांपासून तयार केलेले पाणी किंवा चहा मेंदूच्या कार्यक्षमतेसाठी लाभदायक मानला जातो. विद्यार्थ्यांसाठी आणि सतत मानसिक काम करणाऱ्यांसाठी हे एक नैसर्गिक टॉनिक आहे. हे पाणी रोज घेतल्यास स्मरणशक्ती आणि एकाग्रतेत सुधारणा होते.
३. संधीवात आणि सांधेदुखी: गोकर्णाचा काढा संधिवात, सांधेदुखी, आणि जॉईंट पेनमध्ये अत्यंत उपयोगी ठरतो. शरीरातील सूज कमी करतो आणि सांध्यांना लवचिकता प्रदान करतो.

# आपण आपसात भांडू नका कारण...

लहानशा गोष्टी, मोठा अर्थ : शिल्पा अष्टमकर


मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे. एकमेकांशी जुळवून राहणे, परस्परांना सहकार्य करणे हेच मानवी जीवनाचे सौंदर्य आहे. परंतु जेव्हा आपण आपापसांत भांडतो, तेव्हा त्या भांडणात केवळ शब्द नव्हे, तर नातेसंबंधही तुटतात.
श्रेष्ठी जे जे मेळविले। त्यासाठी भांडत बैसले। मग जाणावे फावले। गलिमासी।। छत्रपती संभाजीस पत्र
आपल्याकडे पराक्रम, शिस्तबद्धता, युद्धसामुग्री , माणुसकी यांची कमतरता कधीच नव्हती. मग आपण लढाया का हरलो ? थोडा विचार केला तर असे ध्यानात येईल की निःसंशयपणे आपला घात आपणच केला. आपापसातील भांडणं आपल्या नाशास कारणीभूत ठरली.
औरंगजेब सात लाख फौज घेऊन जेव्हा शिवछत्रपतींचे स्वराज्य गिळंकृत करण्यासाठी महाराष्ट्रात आला, त्यावेळी शिवाजी महाराजांच्या नंतर त्यांचा उत्तराधिकारी कोण ? संभाजी की राजाराम ? यावरून वादंग चालला होता. हे दोन्ही गट आपापसात भांडत बसले होते. त्याचा लाभ औरंगजेबाला मिळाला. औरंगजेबाला फितूर झालेल्या माणसांनी संभाजी राजांना पकडून देण्यास मदत केली. म्हणून शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर संभाजी महाराजांना लिहिलेल्या पत्रात समर्थांनी वरील उपदेश त्यांना केला. आपण आपापसात कसे भांडतो व आपण आपसातच भांडलो तर शत्रू युद्ध न करता विजय मिळवेल हे सत्य त्यांनी स्पष्ट केले. शत्रू त्याचा कसा फायदा करून घेतो हे सांगणारी ही घटना पाहा
१६२४ साली अहमदनगर येथे निजामाचा दरबार भरला होता. दरबारात अनेक सरदार जमले होते. दरबार संपला. सारे जण आपआपल्या घरी निघाले. वाटेत खंडागळे नामक सरदाराचा हत्ती उधळला. तो सैरावैरा धावू लागला. माणसे हत्तीच्या पायाखाली चिरडली जाऊ लागली. सर्वत्र एकच हलकल्लोळ! आरडाओरडा सुरू झाला.
एव्हढ्यात संभाजी राजे भोसले व शहाजी राजे भोसले हे दोघे बंधू म्हणजे जिजाबाईचा दीर आणि पती त्या हत्तीला अडवण्यासाठी पुढे सरसावले. पण जिजाबाईचा भाऊ दत्ताजी जाधव त्यांना म्हणाला तुम्ही हत्तीला मारू नका. आम्ही हत्तीला शांत करतो. हत्ती कुणालाच आवरेना. अखेर संभाजीने हत्तीला ठार केले.त्यावरून भोसले व जाधव यांचे भांडण जुंपले. त्याचे लढाईत रुपांतर झाले. संभाजीने दत्ताजीस ठार केले. आपले सुपुत्र मारले गेल्याचे कळताच दत्ताजीचे वडील लखुजी जाधव खुद्द आपल्या जावयावर तुटून पडले. सहजी राजे जखमी झाले. संभाजी भोसले मारले गेले. जिजाबाईचा दीरही मरण पावला.जिजाबाईनी दिरासाठी लढावे की भावासाठी? पण आपापसातील भांडणाने त्या स्वराज्याचे नुकसान झाले. जिजाबाईंसारखी दृढता ठेवली पाहिजे.



भांडणामुळे मनात कटुता निर्माण होते, राग वाढतो, आणि शांतता नष्ट होते. शाळेत मुलं जर एकमेकांशी भांडली, तर त्यांचा अभ्यास बिघडतो, मैत्री कमी होते. घरात भांडण झालं, तर कुटुंबातील प्रेम हरवतं. समाजात भांडण झालं, तर विकास थांबतो. भांडणाऐवजी संवाद साधा, एकमेकांचे विचार ऐका. क्षमाशीलतेतच मोठेपण असते हे लक्षात ठेवा. जिथे प्रेम, सहकार्य आणि समजूतदारपणा आहे, तिथे भांडणाला स्थान नसते. म्हणूनच आपसात भांडू नका, मनापासून जुळा, सहकार्य करा आणि एकत्र चला. एकतेत शक्ती आहे हे आपल्याला इतिहासातूनही शिकायला मिळते. जेव्हा लोक एकत्र येतात, तेव्हा कितीही मोठं काम सहज पार पाडता येतं. पण जेव्हा प्रत्येकजण वेगळं वागतो, तेव्हा शक्ती कमी होते.
मुंग्या बघा एकटी मुंगी काही करू शकत नाही, पण सगळ्या मुंग्या मिळून डोंगराएवढा अन्नसाठा तयार करतात. पक्षी मिळून घरटे बांधतात, सैनिक मिळून देशाचं रक्षण करतात, शिक्षक आणि विद्यार्थी मिळून शाळेचं नाव उज्वल करतात. संघटन म्हणजे फक्त लोक एकत्र येणे नव्हे; तर समान हेतू, सामायिक प्रयत्न आणि परस्पर विश्वास. जिथे संघटन असते, तिथे प्रगती निश्चित असते. एकतेने चाललो तर यश आपले, फुटलो तर

# पाकिस्तान पेचात


‘तेहरिक ए तालिबान पाकिस्तान’ला आम्ही पोसले, आता ही संघटना आमच्यावरच उलटली, असा त्रागा पाकिस्तानने केला. अफगाण नागरिकांना परत पाठविण्याची मोहीम तीव्र केल्यास संघर्ष टोकाला जाईल. पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यातील रक्तरंजित संघर्ष अनपेक्षित नाही. सोयीनुसार रंग बदलणार्या पाकिस्तानच्या भूमिकेचे ते फलित होय. रशियाविरूद्ध लढण्यासाठी अमेरिकेच्या मदतीने पाकिस्तानने तालिबानची निर्मिती केली. पाकिस्तानची गुप्तहेर संघटना आयएसआयने यात मोठी भूमिका बजावली. आज अफगाणिस्तानात तालिबानची राजवट आहे आणि पाकिस्तानात ‘तेहरिक ए तालिबान पाकिस्तान’चे सर्वदूर जाळे! सीमेपलीकडून आणि सीमेच्या आतून पाकिस्तानवर हल्ले होत असून स्वतःच्या जाळ्यात पाकिस्तान फसला आहे. ‘तेहरिक ए तालिबान पाकिस्तान’ला भारत मदत करत आहे, असा आरोप पाकिस्तानने नुकताच केला. अपयश लपविण्यासाठी प्रचारतंत्र वापरण्यात पाकिस्तान वाकबगार आहे. भारतावरील आरोप हे त्याचेच उदाहरण. अफगाणिस्तानबरोबरच्या आताच्या संघर्षात तालिबानशी संबंधित दोनशेहून अधिक अतिरेकी ठार झाले, असा दावा पाकिस्तानने केला; मात्र त्या देशाच्या गोबेल्सनीतीमुळे या माहितीवर विश्वास ठेवता येत नाही. त्यांच्या लेखी उद्ध्वस्त विमानतळ, बेचिराख धावपट्ट्या हा ‘ऑपरेशन सिंदूर’नंतर झालेला त्यांचा विजय होता! अफगाणिस्तानातून अमेरिकेला पळ काढावा लागला आणि सत्तेची सूत्रे तालिबानकडे द्यावी लागली. ते



उशिरा सुचलेले शहाणपण होते. सारासार विवेक नसलेल्या डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडून ती अपेक्षा करता येत नाही.
अफगाणिस्तानातील बाग्राम विमानतळ अमेरिकेकडे सोपविण्याची मागणी त्यांनी केली; तीही जाहीरपणे! रक्तरंजित संघर्ष जागतिक शांततेला चूड लावणार्या ट्रम्प यांच्या आहारी गेल्याने पाकिस्तानने त्यांची नोबेलसाठी शिफारस केली. ट्रम्प यांच्या पुढाकाराने तयार झालेल्या गाझा शांतता करारास पाठिंबा देण्याशिवाय पाकिस्तानपुढे पर्याय नव्हता. या पार्श्वभूमीवर, विशेषतः बाग्राम विमानतळाच्या मागणीवर अफगाणिस्तान सरकार संतप्त होणे स्वाभाविक. याशिवाय अफगाणिस्तान आणि पाकिस्तान यांच्यातील ड्युरंट रेषेचाही प्रश्न आहे.
त्यातून सीमेवर रक्तरंजित संघर्ष सुरू झाला. ‘तेहरिक ए तालिबान’चा म्होरक्या नूर वली महसूद याला लक्ष्य करत पाकिस्तानने अफगाणिस्तानवर हवाई हल्ले केले. महसूद ठार झाल्याचा पाकिस्तानचा दावा असला तरी तालिबानने याचा इन्कार केला आहे.
‘तेहरिक ए तालिबान’चे सदस्य अफगाणिस्तानात दहशतवादाचे प्रशिक्षण घेतात आणि पाकिस्तानमध्ये घातपात घडवितात, असा पाकिस्तान सरकारचा आरोप. तालिबानसाठी पाकिस्तानमध्ये प्रशिक्षण केंद्रे चालविली जात होती.
तोपर्यंत ही संघटना पाकिस्तानसाठी अतिशय धर्मनिष्ठ होती! खैबर पख्तुनख्वाच्या काही भागासह बृहत अफगाणिस्तान, हे तालिबानचे उद्दिष्ट आहे. अमेरिकेचे अध्यक्ष सोबत असल्याने आपल्याला आता कोणाचीही आडकाठी नाही, हा पाकिस्तानचा समज. बलुचिस्तान लिबरेशन आर्मी आणि तेहरिक ए तालिबान पाकिस्तान तो समज योग्यप्रकारे दूर करत आहेत! सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेद्वारे सैन्याची ने आण करताना पाकिस्तानचे सैनिक लष्करी गणवेशात नसतात. लष्करी गणवेश ही बलुचिस्तान आणि खैबर पख्तुनख्वा या प्रांतात वावरण्यासाठी जोखीम ठरली आहे. लष्करप्रमुख असीम मुनीर यांची ही ‘कर्तबगारी’! अफगाणिस्तानकडे आज हवाई दलाचे बळ नाही अथवा पाकिस्तानला थेट लढाईत नमवू शकणारी क्षेपणास्त्रे वा अन्य साधने नाहीत. मात्र; जेथे कुठल्याही महासत्तेचा निभाव लागला नाही तेथे पाकिस्तान टिकू शकेल, अशी थोडीही शक्यता नाही. म्हणूनच आताच्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर सौदी अरेबिया आणि कतार संवादासाठी पुढे आले. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये देखील पाकिस्तानने काबूलवर हवाई हल्ला केला होता. त्याचवेळी तालिबानने सूड घेण्याची शपथ घेतली होती.
तेव्हापासून पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यातील दरी वाढली. आता संघर्ष तात्पुरता थांबेल; पण सामंजस्य पुन्हा निर्माण होणे कठीण. तालिबानला शह देण्यासाठी आजही काही प्रमाणात अस्तित्व कायम असलेल्या ‘नार्दन अलायन्स’शी पाकिस्तानकडून संपर्क वाढवला जाऊ शकतो, मात्र ती पाकिस्तानसाठी घोडचूक ठरण्याचीच शक्यता अधिक.

## वैवाहिक जीवनासाठी प्राचीन नियम व फायदे

डॉक्टर टीप्स



प्राचीन नियमांप्रमाणे सहवास केल्याने वंशवृद्धी, मैत्रीलाभ, साहचर्य सुख, मानसिक परिपक्वता, दीर्घायू, शारीरिक आणि मानसिक आरोग्याची प्राप्ती होते. पुरातन काळात दंपती प्रत्येक रात्री भेटत नव्हते. संतती प्राप्ती या उद्देश्याने ते शारीरिक सुखाचा आनंद घ्यायचे.

**नववा नियम**

गर्भकाळ दरम्यान संबंध बनवू नये. या दरम्यान संभोग केल्यास संतती अपंग, आणि आजारी पैदा होण्याचा धोका असतो.

## विनोद




तिसरं माणूस
नूतन पत्नी : अहो, एकलं का? आपल्याकडे एक तिसरं माणूस येणार आहे!
पती : आँ? खरंच? म्हणजे तुला ..
पत्नी: इश्श, सासूबाई येणार आहेत दिवाळीसाठी!

## संदेश

Santa: bhaisaab, yahaa se mumbai kitna door hai?
Vyakti: 400 km.
Santa: baap re, mujhe aaj hi vaapas lautnaa hai. mumbai se yahaa tak kitnaa door hai?

## सुविचार


हे जग एक विसंगती आहे, व हे विश्व एक विरोधाभास आहे.
– केदार जोशी

### संस्कृत सुभाषित

**मज समग्रते जाणसी ऐसे । आपुलिया तळहाताचे रत्न जैसे।**
**अर्जुना तया नाव ज्ञान । येर प्रपंचु हे विज्ञान ।**
**तेथे सायाबुद्धी ते अज्ञान । हेही जाण**

**अर्थ –** प्रपंचविज्ञान हेच सत्य मानणे याला, ज्ञानेश्वर माऊली अज्ञान म्हणतात. मला म्हणजे भगवंताला सामग्र्याने जाणणे, ते खरे ज्ञान म्हणतात. हे ज्ञान जाणणे, हेच जन्माचे सार्थक, बाकी सारे निरर्थक !

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. अभिनयकलेचा बादशहा, नटश्रेष्ठ
६. राजमहाल
९. दरवाजा
११. लेमनग्रास म्हणजे --- चहा
१२. माजलेला
१३. शपथ
१४. छाती
१६. भांडणाची कळ
१८. लठ्ठ, स्थूल
१९. कडक, न दबणारे
२१. '-- मुखी परमेश्वर'
२३. शिर्डीचे संत
२५. चलती, उत्कर्ष
२७. गोधनाचे दान
२९. आवाज, नाद
३१. बोजा, वजन
३२. केव्हा (ग्रा.)
३३. मौजा, गंमत
३४. नेमस्त धोरण
३६. देऊन टाकणे, त्याग करणे
३८. परंपरागत
४०. चोरटा आवाज
४१. व्रताच्या उद्यापनानंतरचे दान
४४. मग्न, गुंग, रममाण
४५. शंकराचे एक नाव
४६. प्रत्येक, दर
४७. वाळा
४९. बगळा
५१. श्रीमंत
५४. चणचण, न्यूनता
५६. जमीन
५७. अहंकार, गर्व
६०. संपत्ती, पैसाअडका
६१. समुद्र
६३. राजाची मुलगी
६५. तरटाची वनस्पती
६६. बोकड
६७. मागणारा
६८. चिवचिवाट
६९. सुविधा
७०. हमाल (हिंदी)
७१. रानटी
७३. काही न करता वर्षागणिक वाढणारे
७४. लेंगा
७६. बोलविणे
७७. सततची गर्दी
७९. सुंदर तरुणी
८०. नजरेचा तीर
८१. करवंद

### उभे शब्द

१. निम्मे झालेले
२. पर्वत
३. मुसलमान
४. दक्षकन्या
५. डोक्यावर मारलेल्या चापट्या
६. योग्य
७. तारुण्य (हिंदी)
८. डाळिंब्या
९. सेवक
१०. रेंगाळत, --- गमत
१२. अभिप्राय, धारणा
१३. ज्वारीची वाळलेली ताटे
१५. अत्यंत थोडा वेळ
१६. सापळा, पेच
१७. एकत्र बांधलेला ऐवज
१८. दोन सुगंधी पांढरी फुले
२०. हात
२१. मर्यादा
२२. देवाणघेवाण
२४. पोते
२६. पिशाच्चाला ठेवलेले अन्न
२८. पुरुष
३०. सिंह
३१. हमाल
३३. मान ----
३३अ. खूप, पुष्कळ
३५. माणुसकी
३७. प्रहार
३९. घाव
४०. कबूतर
४२. मऊ
४३. शक्कर
४८. एक तारवाद्य
५०. त्रिदोषातील थंडीत वाढणारा दोष
५२. लिहिणारा प्रतिभावंत
५३. भविष्य सांगण्याची एक विद्या
५५. थेट, सरळ
५८. कीव करण्यासारखी स्थिती
५९. नंतर
६०. छोटे धनुष्य
६१. मला (कवितेत)
६२. मुंबईचा घरगडी
६३. युवराज
६४. कोर्ट, अदालत
६५. दह्याचे पेय
६६. हुशार (हिंदी)
६९. लग्न, नातेसंबंध
७२. उशीराने पिकणारे धान्य, रास ---
७४. जल
७५. लोक
७६. आई
७७. ओले खोबरे
७८. निवारा

### आडवे उत्तरे

१.अभिनयसम्राट ६.राजवाडा ९.दार
११.गवती १२.मस्तवाल १३.कसम
१४.वक्ष १६.कलागत १८.जाड १९.टणक
२१.पाचा २३.साईबाबा २५.भरभराट
२७.गोदान २९.रव
३१.भार ३२.कवा ३३.जा ३४.नरमाई
३६.दान ३८.रवारास्त ४०.किनरा
४१.वानवसा ४४.रत ४५.सदाशिव ४६.हर
४७.खस ४९.बक ५१.तालेवार ५४.कम
तरता ५६.भू ५७.मद ६०.धन ६१.म
करालय ६३.राजकन्या ६५.ताग ६६.अज
६७.याचक ६८.कलकलाट ६९.सोय
७०.कुली ७१.जंगली ७३.वय ७४.पायजमा
७६.आमंत्रण ७७.रीघ
७९.रमणी ८०.नयनबाग
८१.भोकर

### उभे उत्तरे

१.अर्धवट २.नग ३.यवन ४.सती ५.टपला
६.रास्त ७.जवानी ८.वाल ९.दास १०.रमत
१२.मत १३.कडबा १५.क्षणभर १६.कचाट
१७.गठ्ठा १८.जाईजुई २०.कर २१.पारावार
२२.आदानप्रदान २४.बारदान २६.भक
२८.नर ३०.वनराज ३१.भारवाहक ३३.म
रातब ३३अ.जास्त
३५.मानवता ३७.घाव ३९.वार ४०.पारवा
४२.नरम ४३.साखर ४८.सतार
५०.कफ ५२.लेखक ५३.रमल
५५.तडक ५८.दयनीय ५९.मग
६०.धनुकली ६१.मजला ६२.रामा
६३.राजकुमार ६४.न्यायालय ६५.ताक
६६.अकलमंद ६९.सोयरीक ७२.गरबा
७४.पाणी ७५.जन ७६.माय ७७.चव
७८.घर



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### मोहम्मद शमीची निवड न झाल्याने निराशा, निवडकर्त्यांवर अप्रत्यक्षपणे साधला निशाणा



नवी दिल्ली–टीम इंडियाचा अनुभवी वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी याला ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या आगामी एकदिवसीय आणि टी–२० मालिकेसाठी संघात स्थान न मिळाल्याने त्याने आपली निराशा व्यक्त केली आहे. निवड समितीच्या या निर्णयावर त्याने थेट आक्षेप घेतला नसला तरी, त्याच्या विधानातून संघात स्थान न मिळाल्याची खंत स्पष्टपणे जाणवते.ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी संघात निवड न झाल्याबद्दल बोलताना मोहम्मद शमीने स्पष्ट केले की, ''निवड होणे किंवा न होणे हे माझ्या हातात नाही. निवड समिती, प्रशिक्षक आणि कर्णधार यांचे हे काम आहे. त्यांना वाटले की मी संधीसाठी पात्र आहे, तर ते नक्कीच निवड करतील.''तो पुढे म्हणाला की, ''मी पूर्णपणे तंदुरुस्त आहे आणि सातत्याने सराव करत आहे. मी नेहमीप्रमाणे कठोर परिश्रम करत राहीन.'' त्याच्या फिटनेसबाबत पसरलेल्या अफवांवर पूर्णविराम लावत त्याने सांगितले की, नुकत्याच झालेल्या दुलीप ट्रॉफीमध्ये त्याने ३५ षटके गोलंदाजी केली आणि त्याला कोणतीही समस्या जाणवली नाही. शमीने आपण फिट असल्याचे सांगितल्यानंतरही त्याची निवड न झाल्याने अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत.

***

### सीरिज जिंकल्यावर रागावला गौतम गंभीर, केली मोठी मागणी, नेमके काय घडले?

मुंबई–भारत विरुद्ध वेस्ट इंडिज यांच्यात दोन सामन्यांची टेस्ट सिरीज खेळवण्यात आली असून यातील दुसरा सामना हा दिल्लीच्या



अरुण जेटली स्टेडियमवर पार पडला. दिल्ली मागील ५ दिवसांपासून सुरु असलेल्या टेस्ट सामन्यात टीम इंडियाने वेस्ट इंडिजवर ७ विकेटने विजय मिळवला आहे. यापूर्वी देखील टीम इंडियाने अहमदाबाद येथे झालेला पहिला टेस्ट सामना जिंकला होता. ज्यामुळे भारताने सीरिज २–० ने जिंकली. मात्र सीरिज जिंकल्यावर सुद्धा टीम इंडियाचा हेड कोच गौतम गंभीर नाराज दिसला. गौतम गंभीरने पत्रकार परिषदेत ही नाराजी व्यक्त करत एक मागणी केली.

गौतम गंभीर का भडकला? टीम इंडियाचा हेड कोच गौतम गंभीरच्या मते, दिल्लीच्या पिचने वेगवान गोलंदाज आणि फिंगर स्पिनर्सना फारशी मदत केली नाही. या सामन्यात जसप्रीत बुमराह आणि मोहम्मद सिराज यांना विकेटसाठी संघर्ष करावा लागला. अरुण जेटली स्टेडियमची पिच ही स्पिनर्ससाठी उपयुक्त आहे परंतु रवींद्र जडेजा आणि वॉशिंग्टन सुंदर यांना त्यातून कोणतीही मदत मिळाली नाही. अशा परिस्थितीत, गंभीरने सामना जिंकल्यावर पिचचा वेग आणि उसळीच्या कमतरतेबद्दल चिंता व्यक्त केली आणि अशी पिच मिळणं निराशाजनक होतं असे देखील म्हटले.

***

### अर्जुन तेंडुलकरची संघात निवड, साखरपूड्यानंतर खेळणार महत्वाची सिरीज

मुंबई–सचिन तेंडुलकरचा मुलगा अर्जुन तेंडुलकर पुन्हा एकदा



मैदानात उतरणार आहे. अर्जुनचे काही दिवसांपूर्वीच साखरपूडा पार पडला होता, त्यानंतर तो लवकरच मैदानात परतेल.२०२५–२६ रणजी ट्रॉफीसाठी त्याची गोवा संघात निवड झाली आहे आणि तो १५ ऑक्टोबरपासून संघाकडून खेळेल. अर्जुन गोव्याचा नियमित खेळाडू आहे आणि २०२५ मध्ये त्याचा पहिला वरिष्ठ सामना खेळणार आहे. डिसेंबर २०२४ पासून तो एकही देशांतर्गत सामना खेळलेला नाही.अर्जुन आयपीएल २०२५ साठी मुंबई इंडियन्स संघाचा भाग होता पण तो बेंचवर राहिला. तो प्री–सीझन सामन्यांमध्ये गोव्याकडून खेळला होता, परंतु त्या सामन्यांची गणना केली जात नाही.अर्जुनने नोव्हेंबर २०२४ मध्ये अरुणाचल प्रदेशविरुद्ध त्याचा शेवटचा प्रथम श्रेणी सामना खेळला होता. त्याने डिसेंबर २०२४ मध्ये त्याचा शेवटचा लिस्ट ए सामना खेळला. २०२४–२५ हंगामात त्याने गोव्यासाठी तीन टी२० सामने खेळले.२०२२–२३ हंगामापूर्वी अर्जुन गोव्यात आला आणि त्याने संघासाठी तिन्ही फॉरमॅट खेळले आहेत.२६ वर्षीय या खेळाडूने १७ प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये ३७ विकेट्स घेतल्या आहेत आणि ५३२

### भारत पाकिस्तानचे ज्युनिअर हॉकीपटू आले आमनेसामने आणि घडली हीघटना

मलेशिया–पहलगाममध्ये पाकिस्तान पुरस्कृत अतिरेक्यांनी धर्म विचारुन पर्यटकांची हत्या केली. यानंतर आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत तीन वेळा भारत आणि पाकिस्तानचे पुरुष क्रिकेट संघ तसेच आयसीसी महिला विश्वचषकात एकदा भारत आणि पाकिस्तानचे संघ आमनेसामने आले.

## विराट आणि रोहित वनडेतून निवृत्ती घेणार? बीसीसीआयने सांगितले सत्य...

नवी दिल्ली: भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (इउउख) उपाध्यक्ष राजीव शुक्ला यांनी, वरिष्ठ फलंदाज विराट कोहली आणि रोहित शर्मा आगामी ऑस्ट्रेलिया दौऱ्यानंतर एकदिवसीय क्रिकेटमधून निवृत्त होतील, या अफवा फेटाळून लावल्या आहेत.

भारत १९ ऑक्टोबरपासून ऑस्ट्रेलियाविरुद्ध तीन एकदिवसीय आणि पाच टी–२० सामन्यांची मालिका खेळणार आहे. या मालिकेपूर्वी, रोहित आणि विराट यांच्या एकदिवसीय क्रिकेटमधील निवृत्तीबद्दल जोरदार चर्चा सुरू होती. या दोन्ही खेळाडूंनी यापूर्वीच टी–२० आणि कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे आणि आता ते केवळ ५० षटकांच्या फॉर्मेटमध्ये खेळत आहेत.

मात्र, राजीव शुक्ला यांनी निवृत्तीच्या चर्चांना पूर्णविराम दिला आहे. एका वृत्तसंस्थेशी बोलताना शुक्ला म्हणाले की, रोहित आणि विराटचा एकदिवसीय संघात असणे आमच्यासाठी खूप फायदेशीर आहे. कारण ते दोघेही महान फलंदाज आहेत आणि त्यांच्या उपस्थितीत मला वाटते की आम्ही ऑस्ट्रेलियाला हरवण्यात यशस्वी होऊ.



पुढे म्हणाले, आणि ही त्यांची शेवटची मालिका असेल, असे म्हणणे पूर्णपणे चुकीचे आहे. आम्ही या गोष्टींमध्ये पडू नये. खेळाडूंनी कधी निवृत्त व्हायचे हे त्यांच्यावर अवलंबून आहे. ही त्यांची शेवटची मालिका असेल, असे म्हणणे पूर्णपणे चुकीचे आहे.

रोहित आणि विराट हे दोघेही ऑस्ट्रेलिया दौऱ्याद्वारे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पुनरागमन करत आहेत, त्यांनी यापूर्वी मे महिन्यात कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतली होती.

या मालिकेपूर्वी निवड समितीने एकदिवसीय संघाचे नेतृत्व रोहित शर्माकडून युवा शुभमन गिलकडे सोपवले आहे. पुढील एकदिवसीय विश्वचषक दोन वर्षांनी होणार असल्याने, गिलला मोठ्या स्पर्धेसाठी तयार करण्यासाठी नेतृत्वाची जबाबदारी देण्यात आली आहे.

दरम्यान, मालिकेसाठी रोहित आणि कोहली दोघेही दिल्लीत दाखल झाले असून, १५ ऑक्टोबरच्या पहाटे ते संघासोबत ऑस्ट्रेलियासाठी रवाना होतील. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पहिला एकदिवसीय सामना १९ ऑक्टोबर रोजी पर्थ येथे होणार आहे.

# टीम इंडियाचा वेस्ट इंडिजवर ७ विकेट्सने दणदणीत विजय



सलग १०वी कसोटी मालिका खिशात!

नवी दिल्ली : भारतीय क्रिकेट संघाने वेस्ट इंडिजविरुद्धच्या (खपवळर ीी थर्शीं खपवळशी) दुसऱ्या कसोटी सामन्यात शानदार विजय मिळवून २–० अशा फरकाने मालिका खिशात घातली आहे. या विजयासह टीम इंडियाने कॅरेबियन संघाला व्हाईटवॉश (थहळींशुरीह) दिला आहे. दुसऱ्या कसोटीत वेस्ट इंडिजने भारतासमोर विजयासाठी १२१ धावांचे माफक आव्हान ठेवले होते. टीम इंडियाने हे आव्हान केवळ ३५.२ ओव्हर्समध्ये ३ विकेट्सच्या मोबदल्यात सहज पूर्ण केले आणि ७ विकेट्सने विजय मिळवला. वेस्ट इंडिजविरुद्ध टीम इंडियाचा हा सलग १० वा कसोटी मालिका विजय ठरला आहे, जो एक मोठा विक्रम आहे. युवा कर्णधार शुभमन गिल याच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाचा हा पहिला कसोटी मालिका विजय ठरला आहे. या ऐतिहासिक विजयाचे महत्त्व आणखी वाढले कारण, टीम इंडियाने हा विजय आपल्या हेड कोच गौतम गंभीर याला वाढदिवसाचे खास भेट म्हणून समर्पित केला. दुसऱ्या कसोटीत के. एल. राहुलने नाबाद ५८ धावांची महत्त्वपूर्ण खेळी करत संघाला विजय मिळवून दिला. भारताच्या या निर्भेळ विजयामुळे वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या (थढउ) गुणतालिकेतही संघाला मोठी झेप घेता आली आहे.

ठाण्याच्या मेट्रोचे डिसेंबरमध्ये होणार उद्घाटन, 'या' मार्गावर धावणार मेट्रो

ठाणे : ठाणे शहरातील पहिली मेट्रो सेवा डिसेंबर २०२५ मध्येच सुरू होणार आहे. उद्घाटनाची तारीख लवकरच जाहीर होणार आहे. उद्घाटनानंतर काही तासांतच ठाणे ...

चौथ्या दिवसाचा खेळ थांबला, अंतिम दिवशी फक्त ५८ धावांची गरज

टीम इंडियाने विजयाच्या दिशेने निर्णायक वाटचाल केली आहे. चौथ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत भारताने १२१ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना, एक गडी गमावून ६३ धावा केल्या होत्या. चौथ्या दिवसाचा खेळ थांबला तेव्हा भारताला विजयासाठी केवळ आणखी ५८ धावांची गरज होती. भारताने सलामीवीर यशस्वी जैस्वाल याच्या रुपात पहिली विकेट गमावली. यशस्वी ८ धावा करून मैदानाबाहेर परतला.

अनुभवी फलंदाज केएल राहुल (घङ ठर्हीश्र) आणि युवा साई सुदर्शन (डरळ डींवहर्शीरप) ही जोडी त्या वेळी नाबाद परतली होती. पाचव्या आणि अंतिम दिवशी भारताने राहिलेल्या ५८ धावांचा पाठलाग केला. भारताने या धावा आणखी २ विकेट्स गमावून म्हणजे एकूण ३ विकेट्स गमावून) पूर्ण केल्या आणि ७ विकेट्सने सामना जिंकला. केएल राहुलच्या संयमी अर्धशतकी खेळीमुळे भारताने हा विजय सहज साकारला.

राहुलचे नाबाद अर्धशतक निर्णायक

वेस्ट इंडिजविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात १२१ धावांचा पाठलाग करताना भारताच्या दुसऱ्या डावात काही विकेट्स गमावल्या असल्या तरी, अनुभवी फलंदाज केएल राहुल आणि युवा खेळाडूंनी संयम दाखवत संघाला विजय मिळवून दिला. युवा फलंदाज साई सुदर्शनने (डरळ डींवहर्शीरप) संघाला चांगली सुरुवात करून दिली. त्याने ७६ चेंडूंमध्ये ५ चौकारांसह ३९ धावांची महत्त्वाची खेळी केली. कर्णधार शुभमन गिल १३ धावा करून तंबूत परतला. त्यानंतर केएल राहुल याने दुसऱ्या डावात प्रमुख भूमिका बजावली. त्याने संयम आणि आक्रमकता यांचा योग्य समन्वय साधत १०८ चेंडूत २ षटकार आणि ६ चौकारांसह नाबाद ५८ धावांची अर्धशतकी खेळी केली. गिल बाद झाल्यानंतर केएल राहुल आणि यष्टीरक्षक फलंदाज ध्रुव जुरेल या जोडीने भारताला विजयापर्यंत पोहोचवले. ध्रुव जुरेलने नाबाद ६ धावा करून राहुलला उत्तम साथ दिली. केएल राहुलच्या या शानदार नाबाद अर्धशतकामुळे टीम इंडियाने वेस्ट इंडिजविरुद्ध २–० अशा फरकाने ऐतिहासिक मालिका विजय नोंदवला.

## कसोटी क्रिकेटमध्ये मोहम्मद सिराजची शानदार कामगिरी

नवी दिल्ली : भारतीय संघाचा स्टार खेळाडू मोहम्मद सिराजची गोलंदाजी दिवसेंदिवस सातत्याने अधिक प्रभावी होत आहे. या वेगवान गोलंदाजाने विशेषत: कसोटी क्रिकेटमध्ये कमाल कामगिरी केली आहे. २०२५ वर्ष सिराजसाठी अविस्मरणीय ठरले आहे. कारण या वर्षी त्याने कसोटीत सर्वाधिक विकेट्स घेतल्या आहेत. सिराजने केवळ प्रतिस्पर्ध्यांनाच नाही तर बुमराहसह सगळ्यांनाच मागे टाकले आहे. २०२५ मध्ये कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक विकेट्स घेणारा गोलंदाज आता मोहम्मद सिराज ठरला आहे. त्याने झिम्बाब्वेच्या ब्लेसिंग मुजरबानीला मागे टाकले आहे. मुजरबानीकडे आतापर्यंत ३६ विकेट्स होत्या, तर सिराज आता ३७ विकेट्सह पहिल्या क्रमांकावर पोहोचला आहे.याशिवाय मिचेल स्टार्कने २९, जसप्रीत बुमराहने २२ विकेट्स घेतल्या आहेत.

२०२५ मध्ये कसोटीतील सर्वाधिक विकेट्स घेणारे गोलंदाज

मोहम्मद सिराज – ३७, ब्लेसिंग मुजरबानी – ३६

मिचेल स्टार्क – २९, नॅथन लायन – २४

जोमेल वार्रिकन – २३, जसप्रीत बुमराह – २२

शमर जोसेफ – २२, जोश टंग – २१

वेस्ट इंडिज विरुद्ध पहिल्या डावात सिराजने ९ षटकांत १६ धावा देऊन १ विकेट घेतली. दुसर्या डावात त्याने १५ षटकांत ४३ धावा देऊन २ विकेट्स मिळवल्या. म्हणजेच या कसोटीत एकूण ३ विकेट्स त्याने घेतल्या. भारताने दुसर्या दिवशी ५१८ धावा करून डाव घोषित केला होता. प्रत्युत्तरात वेस्टइंडीज पहिल्या डावात २४८ धावांवर गारद झाली. दुसर्या डावात मात्र वेस्टइंडीजने ३९० धावा केल्या आणि भारतासमोर १२१ धावांचे लक्ष्य ठेवले.





## सचिन तेंडुलकर आमचा शेअर होल्डर नाही;कंपनीचे स्पष्टीकरण

मुंबई–आरआरपी सेमीकंडक्टर कंपनीच्या शेअर्सचे भाव १८ महिन्यात ५७००० टक्क्यांनी वाढल्याचा प्रकार समोर आला होता. यानंतर आरआरपी सेमीकंडक्टरने १४ ऑक्टोबर रोजी स्पष्ट केले की, माजी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरने त्यांच्या कंपनीचे कोणतेही शेअर्स खरेदी केलेले नाहीत आणि तो त्यांचा ब्रँड ॲम्बेसेडर देखील नाही. कंपनीच्या शेअर्समध्ये अभूतपूर्व अशी वाढ झाल्यामुळे हे स्पष्टीकरण देण्यात आले आहे, या कंपनीचे शेअर्स एप्रिल २०२४ पासून तब्बल ५७००० टक्क्यांनी वाढले आहेत. याबरोबरच कंपनीने त्यांनी महाराष्ट्र सरकारकडून १०० एकर जमीन विकत घेतलेली नाही असेही स्टॉक एक्सचेंजला सांगितले आहे.कंपनीने काय म्हटलं आहे?मफ्सोशल मीडियावर काही बेजबाबदार व्यक्तींकडून सरवल्या जात असलेल्या अफवांच्या संदर्भात, आम्ही खालीलप्रमाणे स्पष्टीकरण देऊ इच्छितो :१. महान क्रिकेटर सचिन तेंडुलकर यांनी कंपनीचे कोणतेही शेअर्स कधीही खरेदी केले नाहीत. ते कंपनीत शेअर होल्डर नाहीत.२. महान क्रिकेटर सचिन तेंडुलकर कंपनीच्या संचालक मंडळाशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कसलाही संबंध नाही आणि ते मंडळाचा भागही नाहीत किंवा ते कंपनीचे एखादे सल्लागार म्हणूनही काम करत नाहीत.३. महान किकेटक सचिन तेंडुलकर हे कंपनीचे ब्रँड ॲम्बेसेडर नाहीत ४. कंपनीला महाराष्ट्र सरकारकडून कुठलीही १०० एकर जमीन मिळालेली नाही; आणि ५. कंपनीने बीएसई (इडए) साइटवर बोर्ड माहितीचा भाग म्हणून जी समभाग किंमत १० रुपयांवरून ९,००० रुपयांपर्यंत वाढल्याचे दाखवण्यात आले आहे, ते कंपनीच्या आर्थिक स्थितीशी जुळणारे नाहीत,फ्फ असे कंपनीने स्टॉक एक्सचेंजला केलेल्या फाइलिंगमध्ये सांगितले. मफ्पुढे कंपनी असेही स्पष्ट करते की फक्त जवळपास ४००० शेअर्स हे डिमॅट मोडमध्ये आहेत ज्यांचे बाजारात पब्लिक शेअरहोल्डर्स आणि विशिष्ट व्यक्तींकडून अनैतिक मार्गाने ट्रेडिंग केले जात आहेत. यामुळे हे कंपनीच्या आणि महान क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर, ज्यांचा कंपनीशी कोणताही संबंध नाही, त्यांच्या प्रतिष्ठेला हानिकारक ठरत आहे,फ्फ असे आरआरपी सेमीकंडक्टरने पुढे स्पष्ट केले.गेल्या एका वर्षात शेअर्सची किंमत १३००० टक्क्यांनी वाढल्यामुळे आणि एप्रिल २०२४ मध्ये लिस्टेड झाल्यापासून ५७००० टक्क्यांनी वाढल्याने कंपनीला हे स्पष्टीकरण द्यावे लागले आहे. १४ ऑक्टोबर दुपारी २ वाजता आरआरपी सेमिकंडक्टरचे शेअर्स बीएसईवर २ टक्के अप्पर सर्किटमध्ये ८५८४ प्रति

## पांड्याची नवी गर्लफ्रेंड महिका शर्माकडे गूड न्यूज; पोस्ट शेअर करत म्हणाली...



दिल्ली–टीम इंडियाचा स्टार ऑलराउंडर हार्दिक पांड्या नेहमीच त्याच्या ब्लॉकबस्टर खेळीमुळे चर्चेत असतो. पण, गेल्या काही दिवसांपासून हार्दिकच्या चर्चा रंगलेल्या त्या त्याच्या रुमर्ड गर्लफ्रेंडमुळे. हार्दिक पांड्या तसा आधीपासूनच त्याच्या प्रेमप्रकरणांमुळे चर्चेत असतो. त्याच्या वैयक्तिक आयुष्यात अनेक वाद निर्माण झाले आहेत. त्याची घटस्फोटीत पत्नी नताशा स्टॅनकोविकशीपासून वेगळं झाल्यानंतर, बराच काळ हार्दिक सिंगल दिसत होता. पण अखेर हार्दिक पांड्याच्या अफेअरच्या चर्चा रंगल्या आणि त्या सर्व चर्चांना दुजोरा देणारे फोटो आणि व्हिडीओही समोर आले.

हार्दिक आता मुव्हऑन झाला असून तो त्याची नवी प्रेयसी महिका शर्मासोबत दिसला आहे. हो, हार्दिक पांड्या आणि मॉडेल महिका शर्मा डेटिंग करत असल्याचं बोललं जात आहे. हार्दिक पांड्या आणि महिका शर्मा अनेकदा एकत्र स्पॉट झालेले, पण सध्या त्यांना एकमेकांसोबतचे काही फोटो शेअर केले आहेत. हे फोटो पाहून दोघेही रिलेशनमध्ये असल्याचं स्पष्ट होतंय. पण, आता लवकरच हार्दिक पांड्याची रुमर्ड गर्लफ्रेंड गूड न्यूज देणार असल्याचं बोलंल जातंय. याबाबत स्वत: महिकानंच खुलासा केला आहे.

माहिका शर्माकडे गूड न्यूज

हार्दिक पंड्या आणि माहिका शर्मा सध्या व्हेकेशन एन्जॉय करत आहेत. मालदीवमधील त्यांच्या रोमँटिक व्हेकेशनचे फोटो सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आहेत. या फोटोंमध्ये, दोघे एकत्र एन्जॉय करताना दिसत आहेत. दरम्यान, माहिरानं तिच्या इंस्टाग्रामवर एक स्टोरी शेअर केली आहे, ज्यानं सर्वांचं लक्ष वेधून घेतलंय. माहिकानं तिच्या मैत्रिणीची एक स्टोरी पुन्हा शेअर केली आहे. या स्टोरीमध्ये, माहिकाच्या मैत्रिणीनं सांगितलंय की, तिला दिल्लीतील लॅक्मे फॅशन वीक दरम्यान महिकाला खूप मिस केलं.

खरं तर, माहिका शर्मा यावर्षी दिल्लीतील लॅक्मे फॅशन वीकला अनुपस्थित होती. याबद्दल, तिच्या मैत्रिणीनं लिहिलंय की, ''या सीझनमध्ये मला तुझी खूप आठवण आली, पण मी नेहमीच या अनाउन्समेंटची वाट पाहत होते...'' माहिका शर्मानं तिच्या मैत्रिणीची इंस्टाग्राम स्टोरी पुन्हा शेअर करत लिहिलंय की, ''अरे, तो किती गोंडस आहे... मी तुम्हाला लवकरच भेटेन, आणि माझ्यावर विश्वास ठेव, तुझं हे वाट पाहणं व्यर्थ जाणार नाही...'' आता माहिकाचं वक्तव्य नेमकं काय सांगू इच्छित आहे? ती खरोखरच हार्दिक पांड्याशी लग्न करणार आहे का? की आणखी काही चालू आहे...? अशा चर्चा रंगल्या आहेत.

हार्दिक पंड्यासोबत माहिकाचं रोमँटिक व्हेकेशन

हार्दिक पंड्यानं जेव्हापासून महिकासोबतच्या नात्याची अधिकृत घोषणा केली आहे, तेव्हापासूनच दोघेही चर्चेत आहेत. ते एकत्र डिनर डेटवर जाताना अनेकदा स्पॉट झालेत, विमानतळावर एकत्र दिसलेत आणि आता ते मालदीवमध्येही एकत्र आहेत. दोघेही त्यांच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर फोटो शेअर करत आहेत. एका फोटोमध्ये माहिका आणि हार्दिक हात धरून असल्याचं दिसून येतंय. हार्दिक पंड्याची प्रेयसी, माहिका शर्मा, एक मॉडेल आहे आणि सोशल मीडियावर फॅशन कंटेंट शेअर करत असते. दरम्यान, माहिका शर्मापूर्वी हार्दिकचे इतर अनेक महिलांशी नाव जोडलं गेलेलं. अलिकडेच, हार्दिक पंड्या गायिका जास्मिन वालियाला डेट करत असल्याच्या बातम्या समोर आल्या होत्या. या अफवा फक्त अफवाच राहिल्या... हार्दिकनं २०१८ मध्ये नताशा स्टॅन्कोविकला डेट करायला सुरुवात केली. यानंतर हार्दिकनं २०१९ मध्ये नताशाला प्रपोज केलं आणि त्यानंतर दोघांनीही २०२० मध्ये लग्न केलं, परंतु लग्नानंतर फक्त चारच वर्षात, २०२४ मध्येच ते वेगळे झाले.

# महावितरणमधील ग्राहकसेवा कार्यालयांच्या पुनर्रचनेला प्रारंभ

## – तत्पर सुविधा व कर्मचाऱ्यांच्या कामांचे विभाजन
## – शहरी, ग्रामीणमध्ये ग्राहकसंख्येनुसार अभियंता,कर्मचारी
## – कर्मचाऱ्यांच्या कामाचा ताण कमी होवून कामकाजात सुसूत्रता येणार

**लातूर/प्रतिनिधी** : अधिकाधिक ग्राहकाभिमूख सेवा देण्याकरिता महावितरण अंतर्गत थेट ग्राहकसेवा देणाऱ्या उपविभाग व शाखा कार्यालयांची पुनर्रचना करण्यात आली असून या पुनर्रचनेला लातूर परिमंडळात सोमवारी (दि.१३) प्रारंभ झाला.

महावितरणमध्ये उपविभाग व शाखा कार्यालयांद्वारे नवीन वीजजोडणी, मासिक वीजबिल, सुरळीत वीजपुरवठ्यासाठी वीज यंत्रणेची नियमित देखभाल, तांत्रिक बिघाडांची दुरुस्ती, वीजबिलांची थकबाकी वसुली, वीजहानी कमी करणे आदी कामे करण्यात येतात. त्यामुळे अभियंते व तांत्रिक कर्मचाऱ्यांना एकाच वेळी विविध प्रकारची कामे करावी लागत आहेत. ही रचना सुमारे २५ वर्षांपूर्वीची आहे व त्यावेळच्या ग्राहकसंख्येनुसार करण्यात आली होती. पूर्वीच्या रचनेचा परिणाम गेल्या काही वर्षांपासून कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर आणि ग्राहकसेवेवर देखील झालेला दिसून येत आहे. त्यामुळे सरसकट कामांचा ताण कमी करून निवडक कामांची जबाबदारी द्या, अशी मागणी गेल्या दहा वर्षांपासून अभियंता व कर्मचाऱ्यांच्या संघटनांद्वारे करण्यात येत होती. व्यवस्थापनाने त्यासाठी विशेष समिती स्थापन करून कर्मचारी संघटनांशी वेळोवेळी चर्चा करून पुनर्रचनेचे प्रारूप तयार केले आहे. प्रामुख्याने थेट ग्राहकसेवा देणाऱ्या उपविभाग व शाखा कार्यालयांच्या पुनर्रचनेवर भर देण्यात आला आहे. विशेष म्हणजे कमी, शहरी, ग्रामीण व दुर्गम भागांतील ग्राहकसंख्या व भौगोलिक क्षेत्रानुसार संबंधित उपविभाग व शाखा कार्यालयांची फेररचना करण्यात आली आहे. सोबतच ग्राहकसंख्येनुसार अभियंता व तांत्रिक कर्मचाऱ्यांची संख्या निश्चित करण्यात आली आहे.

अशी आहे पुनर्रचना

महावितरणच्या विभाग कार्यालयांमध्ये कोणताही बदल न करता त्यात विभागीय




देखभाल व दुरुस्ती पथकाची निर्मिती करण्यात आली आहे. या १० सदस्यीय पथकात अतिरिक्त कार्यकारी अभियंता, सहायक अभियंता, कनिष्ठ अभियंता व तांत्रिक कर्मचाऱ्यांचा समावेश असेल. विभागातील सर्व उपकेंद्र व ३३ केव्ही वीजवाहिन्यांच्या देखभाल व दुरुस्तीचे काम या पथकाकडे राहणार आहे. तसेच प्रत्येक विभागात सध्या अस्तित्वात सर्व उपविभागांचे महसूल व देयके तसेच देखभाल व दुरुस्ती अशी विभागणी करण्यात येईल. म्हणजे एका विभागात सध्या चार उपविभाग कार्यालये असल्यास पुनर्रचनेत देखभाल व दुरुस्ती तसेच महसूल व देयके असे प्रत्येकी दोन उपविभाग राहतील. देखभाल व दुरुस्ती उपविभागातील अभियंते व तांत्रिक कर्मचारी वीजयंत्रणेची देखभाल व दुरूस्तीची कामे, नवीन वीजयंत्रणा उभारणे, वीजपुरवठ्याच्या तक्रारींचे निवारण आणि वीजपुरवठा सुरळीत ठेवण्याची कामे करतील. तर महसूल व देयके उपविभागातील अभियंते, कर्मचारी नवीन वीजजोडणी, अचूक बिलिंग, बिलिंग तक्रारींचे निवारण, थकबाकी वसुली ही कामे करणार आहेत.

लातूर विभागा अंतर्गत शहर उपविभागांच्या ऐवजी संचलन व सुव्यवस्था (देखभाल व दुरुस्ती) तसेच देयक व महसूल हे उपविभाग निर्माण करण्यात आले आहेत, तर इतर विभागांमध्ये कार्यालयांच्या रचनेत कसलाही बदल न करता केवळ मनुष्यबळाची पुनर्रचना करण्यात आली आहे.

# शॉपर्स स्टॉप साजरा करत आहे सीझन ऑफ गिफ्टिंग

## तान्या मानिकताला यांच्या हृदयस्पर्शी 'गिफ्ट ऑफ लव्ह' दिवाली फिल्मसह

**लातूर/प्रतिनिधी** : शॉपर्स स्टॉप या भारतातील आघाडीच्या फॅशन आणि ब्युटी डेस्टिनेशनने दिवाळीसाठी नवी फिल्म गिफ्ट ऑफ लव्ह लाँच केली असून त्यात प्रसिद्ध ओटीटी अभिनेत्री तान्या मानिकताला झळकणार आहे. या कॅम्पेनच्या माध्यमातून भेट देण्याघेण्याचा आनंद साजरा केला जाणार आहे व विचारपूर्वक निवडलेले गिफ्ट्स कशाप्रकारे प्रेम व्यक्त करतात हे यात पाहायला मिळणार आहे.

या फिल्ममधे तान्याचा शॉपर्स स्टॉप स्टोअरमधला खेळकर, सहज वावर आणि सोबत विविध प्रकारचे कपडे, हँडबॅगपासून परफ्युम्स ते एथनिक वेयर्सपर्यंत ती स्पर्श करते, ते प्रत्येक उत्पादन तिच्या जवळच्यांसाठी प्रेमाचं प्रतीक बनतं. तिची उत्साही उर्जा स्टाइल आणि भावना यांचा मेळ घालणाऱ्या याच्या गोष्टीला साजेशी आणि मनाचा कौल घेऊन निवडलेले गिफ्ट्स सर्वोत्तम असतात याची आठवण करून देणारे आहे.

फिल्म स्टोअरमधून घरी सुरू असलेल्या सेलिब्रेशनकडे जाते, तसे तिने निवडलेले प्रत्येक गिफ्ट योग्य आणि कुटुंबातल्या प्रत्येकाला मनापासून आनंद देणारे ठरते. गिफ्ट्सच्या त्या देण्याघेण्यातून ब्रँडने सोपे सत्य अधोरेखित केले आहे आणि ते म्हणजे, गिफ्ट ही केवळ तुम्ही खरेदी केलेली वस्तू नसते, तर त्यापलीकडे असलेली भावना असते.




दिवाळीसारख्या सणाच्या काळात भावना केंद्रस्थानी असल्याच्या संकल्पनेवर आधारित गिफ्ट्स ऑफ लव्ह हे कॅम्पेन विचारपूर्वक निवडलेल्या गिफ्ट्सद्वारे प्रेम व्यक्त करण्याचा आनंद साजरा करणारं आहे. तुमची प्रत्येक निवड, प्रियजनांना तुम्ही किती जवळून ओळखता ते दर्शवणारी असते.

'गिफ्टचे खरे मूल्य त्यामागे असलेल्या भावनेत दडलेले असते असे शॉपर्स स्टॉपला वाटते,' असे शॉपर्स स्टॉपचे कस्टमर केयर असोसिएट आणि प्रमुख मार्केटिंग अधिकारी श्री. जितेन महेंद्र म्हणाले. अर्थपूर्ण भेटवस्तू अंदाजे घेतलेली नसते, तर विचारपूर्वक जाणिवेतून निवडलेली असते, याची आठवण 'गिफ्ट ऑफ लव्ह' आपल्याला करून देणार आहे. आपल्या प्रियजनांना खरंच काय आवडेल हे माहीत असतं, तेव्हा प्रत्येक गिफ्ट प्रेम, काळजी आणि कनेक्शन यांचे प्रतिबिंब ठरते.

प्रीमियमायझेशन धोरणाचा एक भाग म्हणून शॉपर्स स्टॉप कपडे, हँडबॅग्ज, घड्याळं, फ्रेगरन्सेस, सौंदर्य, स्किनकेयर, होम डेकोर अशा विभागातील ५००+ प्रीमियम ब्रँड्ससह सणांच्या खरेदीचा आनंद उंचावत राहणार आहे. भारतातील चोखंदळ ग्राहकांसाठी ते दिवाळी खरेदीचे डेस्टिनेशन बनत आहे.

खरेदी शॉपमधे किंवा ऑनलाइन करत असताना शॉपर्स स्टॉपच्या पर्सनल शॉपर सर्व्हिसच्या मदतीने खरेदीचा वैयक्तिक आवडीनुसार अनुभव घेता येतो. त्याशिवाय बहुमाध्यमिक विस्तार, विचारपूर्वक निवडण्यात आलेली गिफ्ट्स प्रत्येक खरेदी अर्थपूर्ण बनवतात.

या दिवाळीत शॉपर्स स्टॉप ग्राहकांना मनाचा कल ओळखून गिफ्ट निवडण्याचा आनंद साजरा करण्यासाठी व प्रत्येक क्षण खास करण्यासाठी आमंत्रित करत आहे. तुम्हाला खरेदी ऑनलाइन करायची असो किंवा BZA स्टोअर शॉपर्स स्टॉपद्वारे खरेदीचा अनोखा अनुभव मिळणार आहे. तुमच्या जवळच्या स्टोअरला भेट द्या किंवा लेटेस्ट कलेक्शन व एक्सक्लुसिव्ह ऑफर्सचा www.shoppersstop.com वर ऑनलाइन लाभ घ्या.

# श्री सिद्धेश्वर देवस्थानच्या वतीने अतिवृष्टीबाधीतांच्या मदतीसाठी २५ लाखाचा निधी

## मुख्यमंत्री सहाय्यता निधीस जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून धनादेश

**लातूर/प्रतिनिधी** :ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात मराठवाड्यासह लातूर जिल्हयात अतिवृष्टी झालेली होती. या अतिवृष्टीने शेतकऱ्यांसह नागरीकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. या संकटात शेतकरी आणि नागरीकांना मदतीचा हात अपेक्षीत आहे. त्यामुळे सामाजीक बांधीलकी जोपासत लातूरचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने अतिवृष्टीबांधीतांच्या मदतीसाठी २५ लाखाचा निधी देण्यात आलेला आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधीस सदर निधीचा धनादेश जिल्हाधिकारी वर्षा घुगे-ठाकूर यांच्याकडे देवस्थानचे जेष्ठ विश्वस्त तथा माजी नगराध्यक्ष विक्रम गोजमगुंडे व प्रशासक सचिन जांबुतकर यांच्या हस्ते देण्यात आला.

मराठवाड्यासह लातूर जिल्ह्यात ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टी झालेली आहे. या अतिवृष्टीने



शेती पिकासह शेत जमीनींचे मोठे नुकसान झालेले आहे. त्याचबरोबर पुरपरिस्थितीमुळे अनेक नागरीकांच्या घरांची पडझड झाली तर कांही जणांच्या घरात पाणी घुसून संसारउपोगी साहित्याची नासाडी झालेली आहे. या अतिवृष्टीने शेतकरी व नागरीकांचे मोठे नुकसान झालेले असून या परिस्थितीत त्यांना मदतीचा हात देणे गरजेचे आहे. लातूरचे ग्रामदैवत असलेल्या श्री सिद्धेश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने सामाजीक बांधीलकी जोपासत अतिवृष्टीबांधीतांसाठी मदीतीचा हात पुढे केलेला आहे. देवस्थानच्या वतीने अतिवृष्टीबांधीतांच्या मदतीकरीता २५ लाख रुपयांचा निधी देण्यात आलेला आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधीस देण्यात आलेल्या या रक्कमेचा धनादेश जिल्हाधिकारी वर्षा घुगे-ठाकूर यांच्याकडे देवस्थानचे ज्येष्ठ विश्वस्त तथा माजी नगराध्यक्ष विक्रम गोजमगुंडे व देवस्थानचे प्रशासक सचिन जांबुतकर यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी देवस्थानचे विश्वस्त अशोक भोसले, सुरेश गोजमगुंडे, बाबासाहेब कोरे, चंद्रकांत परदेशी, व्यंकटेश हालींगे व विशाल झांबरे यांची उपस्थिती होती.

श्री सिद्धेश्वर व रत्नेश्वर देवस्थानने नेहमीच सामाजीक बांधीलकी जोपासली असल्याचे सांगत जिल्हाधिकारी वर्षा घुगे-ठाकूर यांनी श्री सिद्धेश्वर व रत्नेश्वर देवस्थानचे अनुकरण जिल्ह्यातील इतर सामाजिक संस्थानी व देवस्थांनानी करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. त्याचबरोबर सदर मदत निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल देवस्थानचे विश्वस्त व प्रशासक यांचे आभार व्यक्त करुन आगामी काळातही देवस्थान समिती सामाजिक बांधीलकी जोपासत राहिल असा विश्वास व्यक्त केला.

श्री सिद्धेश्वर व रत्नेश्वर देवस्थान हे लातूरचे ग्रामदैवत असून या देवस्थानच्या माध्यमातून नेहमीच सामाजिक उपक्रम राबविले जात असल्याचे सांगून ज्येष्ठ विश्वस्त तथा माजी नगराध्यक्ष विक्रम गोजमगुंडे यांनी देवस्थानच्या वतीने कायम लोकहिताला प्राधान्य देण्यात येत असल्याचे स्पष्ट केले. यापुर्वीही देवस्थानच्या वतीने सांगली, कोल्हापूर येथे उद्धवलेल्या पुरपरिस्थितीच्या संकटात तेथील नागरीकांसाठी मदत पाठविले असल्याचे सांगितले. त्याचबरोबर देवस्थानच्या वतीने आरोग्य शिबिर घेऊन नागरीकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी प्रयत्नशिल असते असे सांगून आगामी काळातही देवस्थान नेहमीच लोकहिताला प्राधान्य देऊन सामाजिक बांधीलकी जोपासेल अशी ग्वाही दिली.

# पोलीस कर्मचाऱ्याची दारु पिऊन सहा गाड्यांना धडक, पुणे ग्रामीण पोलिसांकडून प्रकरण दाबण्याचा प्रयत्न

**पुणे/प्रतिनिधी** :दारूच्या नशेत कार चालवणाऱ्या पोलीस कॉन्स्टेबलने सहा वाहनांना जबरदस्त धडक देत अनेकांना गंभीर जखमी केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे, या प्रकरणात आरोपी पोलीस कॉन्स्टेबलला अद्याप अटक करण्यात आलेली नाही, तसेच त्याची वैद्यकीय तपासणीही करण्यात आलेली नसल्याने पुणे ग्रामीण पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रांजणगाव एमआयडीसी पोलिस ठाण्यात कार्यरत असलेला पोलीस कॉन्स्टेबल रविवारी रात्री एका पार्टीला गेला होता. पार्टीदरम्यान मोठ्या प्रमाणात मद्यसेवन केल्याचे सांगितले जात आहे. त्यानंतर दारूच्या नशेत असतानाच त्याने कार चालवली आणि पुणे-नगर महामार्गावर सहा वाहनांना जोरदार धडक दिली. या अपघातात अनेक नागरिक गंभीर जखमी झाले असून, काही वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अपघातानंतर रांजणगाव पोलिसांनी केवळ गुन्हा नोंदवला आहे.

# अभाविप उमरगा पुनर्निर्वाचित शहर मंत्री म्हणून कु.अमृता मुगळे यांची निवड व उर्वरित कार्यकारणी घोषित




**उमरगा/प्रतिनिधी** : अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, उमरगा शाखेच्या वतीने छात्रसत्ता विद्यार्थी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या संमेलनात शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी अभाविप उमरगा शहर मंत्री म्हणून कु. अमृता मुगळे यांची घोषणा करण्यात आली. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून प्रदेश सहमंत्री श्री सुशांत एकोर्गे उपस्थित होते.

निर्वाचन अधिकारी श्री गणेश कटके यांनी शहर मंत्री यांची घोषणा केली व उर्वरित कार्यकारणी शहर मंत्री यांनी घोषित केली. तालुका संयोजक यांनी प्रास्ताविक मांडले ,प्रदेश सहमंत्री यांनी अभाविप मांडणी केली व विद्यार्थ्यांशी संवाद साधला .शहर मंत्री यांनी मंत्री प्रतिवेदन केले व आगामी दिशा सांगितली.

शहर सहमंत्री ऋषी चिंचोळे, ऋतुजा शिंदे, समर्थ कुंभार,शहर कार्यालय मंत्री कु.माधुरी आगडे,सोशल मीडिया संयोजक संकेत हळीखेडकर, स्टुडन्ट फॉर डेव्हलपमेंट संयोजक प्रणित जांभळे व सह संयोजक सृष्टी कस्तुरे,स्टुडन्ट फॉर सेवा संयोजक शेखर सूर्यवंशी व सह संयोजक चैतन्य जाधव,फार्माव्हिजन संयोजक सृष्टी ख्याडे व सह संयोजक रुपाली पवार,राष्ट्रीय कलामंच संयोजक सागर देडे व सह संयोजक श्रध्दा साखरे,खेलो भारत संयोजक प्रतीक्षा राठोड ,मिशन साहसी संयोजक गौरवी कटके,कोष प्रमुख ओमकार चव्हाण यांची निवड करण्यात आली.

# वीर माहेश्वर पतसंस्थेतर्फे मुख्यमंत्री सहाय्यता निधीस मदत



**लातूर/प्रतिनिधी** : येथील वीर माहेश्वर सहकारी पतसंस्थेच्या वतीने मुख्यमंत्री सहाय्यता निधीस १ लाख ११ हजार १०१ रुपयांचा धनादेश लातूरच्या जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा घुगे ठाकूर यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

यावर्षीच्या पावसाळ्यात झालेल्या अतिवृष्टीने तसेच पूर परिस्थितीमुळे जनजीवन पूर्णतः विस्कळित झाले. अनेक शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. अनेक शेतकऱ्यांची गुरेढोरे वाहून गेली. शेतकऱ्यांचे हे झालेले नुकसान भरून निघणारे नाही. तरीही सामाजिक भावनेने प्रेरित होऊन वीर माहेश्वर सहकारी पतसंस्थेने या नैसर्गिक आपत्तीत आपलाही मदतीचा खारीचा वाटा असावा, या उदात्त हेतूने १ लाख ११ हजार १०१ रुपये मुख्यमंत्री सहाय्यता निधीस देण्याचा निर्णय घेतला. या मदतनिधीचा धनादेश आज, मंगळावर दि. १४ ऑक्टोबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांना सुपूर्द करण्यात आला. यावेळी पतसंस्थेचे कीर्तिकुमार देवणीकर, उपाध्यक्ष विजयकुमार मठपती, सचिव अशोक मठपती, संचालक बसवराज स्वामी लिंबाळकर,जगन्नाथ दंदे, काशिनाथ तोगुरगे, वैजनाथ स्वामी आदींची उपस्थिती होती.

# दयानंद विज्ञानमध्ये ऊर्जेची बचत व संवर्धन या विषयावर स्लोगन स्पर्धा

**लातूर/प्रतिनिधी** : येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयातील ग्रंथालय विभागाच्या वतीने दि.१३ ऑक्टोबर २०२५ रोजी ऊर्जे ची बचत व संवर्धन या विषयावर स्लोगन (घोषवाक्य) या स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते.सदरील स्पर्धा दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी,सचिव रमेश बियाणी,संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड व महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या मूळ संकल्पनेतून विद्यार्थ्यांमध्ये ऊर्जेची बचत व संवर्धन याविषयी जाणीवजागृती व्हावी व ऊर्जा बचत व संवर्धनाचा फायदा समाज व राष्ट्राला व्हावा या उद्देशातून घेण्यात आली. या स्लोगन स्पर्धेत एकूण ९३ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद नोंदविला.ह्या स्पर्धेत बी.एस्सी.बी.टी.तृतीय वर्षातील ढवारे पर्णवी प्रधान या विद्यार्थीनीने प्रथम क्रमांक मिळविला तर घोडके आरती संजयकुमार ही बी.एस्सी.प्रथम वर्षातील विद्यार्थीनी द्वितीय आली.प्रथम व द्वितीय येणाऱ्या यशस्वी विद्यार्थीनींना पाचशे रुपये व तीनशे रुपये बक्षीस देण्यात येणार आहे.

# श्री शिवराज पाटील चाकूरकर यांचे विचार जगाला स्पर्श करणारे: प्रा. मोतीपवळे

**लातूर/प्रतिनिधी** :थोर व्यक्तीचा जन्म कुठेतरी व्हायचा असतो म्हणून होत असतो पण त्या ठिकाणच्या किंवा कार्य ठिकाणच्या मर्यादेपर्यंतच त्यांचे नाव व त्यांचे काम असत नाही तर त्यांचे कार्य आणि विचार हे देश पातळीवरच नव्हे तर जगाला स्पर्श करून जाणारे असतात अगदी असेच श्री शिवराज पाटील चाकूरकरांचे आहे असे प्रतिपादन प्राध्यापक पत्रकार श्री बी.व्ही. मोतीपवळे यांनी केले.

भारताच्या लोकसभेचे माजी अध्यक्ष आणि गृहमंत्री श्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या ९० व्या वाढदिवसानिमित्त लातूर येथील प्रथीत यश एम एस बिडवे इंजीनियरिंग कॉलेज च्या सभागृहामध्ये आयोजित केलेल्या वर्कशॉप कार्यक्रमाचे उद्घाटन करताना श्री मोतीपवळे यांनी वरील उद्गार काढले. अध्यक्षस्थानी महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष इंजिनीयर श्री आदिनाथ सांगवे हे होते. सचिव श्री




माधवराव पाटील टाकळीकर, इंजिनीयर संचालक श्री. राजेश्वर बुके कार्यकारी संचालक श्री प्रदीप दिंडीगावे, उपाध्यक्ष श्री माधवराव पाटील तपसे चिंचोली व कॅम्पस मॅनेजर डॉ.श्री मोहनराव बुके तसेच पुण्याहून आलेले डॉक्टर श्री कल्लूर, व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एम. जगदे, डॉ. विरभद्र माळे, माजी प्राचार्य डॉ. ज्योती पाटील, माजी प्राचार्य श्री. सुरेश हाल्लाळे, प्रा. रतन रजपुत, अजयकुमार हामणे इत्यादी उपस्थित होते. कार्यक्रमाचा प्रारंभ सरस्वती पुजनाने झाला.

पुढे बोलताना प्राध्यापक श्री. मोतीपवळे म्हणाले श्री शिवराज पाटील चाकूरकर यांचे कार्य ग्रास रूट पासून देशाच्या सर्वोच्च संस्थेच्या अध्यक्षपदापर्यंत सन्मानाने घेतले जाते त्यांचे व्यक्तित्व बहु आयामी आहे.

लातूर नगरपरिषद पाणीपुरवठा योजना, धनेगाव धरणाच्या निर्मितीची शिदोरी, ब्रॉडगेज रेल्वे, सीआरपीएफ सेंटर, बीएसएफ सेंटर, जिल्ह्यात व राज्यात मिळवून दिलेले साखर कारखाने व सूतगिरण्या हे योगदान सर्वांना माहित आहे. गृहमंत्री असताना देश पातळीवरील पोलीस युनिव्हर्सिटीची निर्मिती, जम्मू काश्मीर आणि नॉर्थ ईस्ट स्टेट मध्ये २००४ ते २००८ पर्यंतच्या काळात सुरळीतपणे पार पडलेल्या निवडणुका, नक्षलवादावरील नियंत्रण आणि त्याचबरोबर पोलीस दल आणि एकूणच यंत्रणेचे मनोधैर्य वाढवून कामात वेग आणण्याचे कार्य प्रशंसनीय असल्याचे प्राध्यापक मोतीपवळे यांनी सांगितले.

उपराष्ट्रपती श्री शेखावत, पंतप्रधान डॉक्टर मनमोहन सिंग, पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी, पंतप्रधान पी व्ही नरसिंहराव, पंतप्रधान आई.के. गुजराल, त्याच्यानंतर चे स्पीकर सोमनाथ चटर्जी, मुख्यमंत्री श्री विलासराव देशमुख, श्री मनोहर जोशी, श्री सुशील कुमार शिंदे, सुनील गावस्कर, मोहन धारिया व इतर अनेकांनी श्री शिवराज पाटील यांचे कार्य आणि व्यक्तित्व याबद्दल केलेल्या प्रशंसेचा उल्लेख करत त्यांच्यासारख्या पुण्यशील व्यक्तीमध्ये ईश्वराचा प्रवेश होऊन त्यांच्यामार्फत जनकल्याणाचे कार्य होते आणि शिवराज पाटील यांच्या बद्दल हे सत्य आहे असे श्री काशी जगतगुरु डॉक्टर श्री चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांनी म्हटल्याचा संदर्भ दिला.

हम सबके सब हमारे हे त्यांच्या जिवनाचे सूत्र असल्याचे सांगून त्यांचे विचार सर्व मानव जातीला स्पर्श करणारे असतात असे प्रतिपादन करून त्यांना दीर्घायुष्य तर मिळालेलेच आहे पण जे काही त्यांचे आयुष्य ठरलेले आहे ते सशक्त व निरोगी रहावे अशी प्रार्थना करून आपले भाषण संपले. श्री मोतीपवळे यांनी केलेल्या भाषणातील वक्तव्यामुळे उपस्थित समुदायाला त्यांनी तब्बल दीड तास खिळवून ठेवले.

अध्यक्षीय भाषणात श्री आदिनाथ सांगवे यांनी श्री शिवराज पाटील यांच्या कार्याचा व विचाराचा आढावा घेऊन त्यांना दीर्घायुष्य चिंतेले. सत्याचा, त्यागाचा व नैतिकतेचा मार्ग दाखवणारे श्री शिवराज पाटील हे दीपस्तंभ आहेत अशा भावना व्यक्त करून ते संस्थेचे सदस्य असून संस्था उभारणीत त्यांचा मोलाचा वाटा आहे याचा आम्हाला अभिमान आहे. असे प्रतिपादन करून श्री. शिवराज पाटील चाकूरकर यांना दिर्घ आयुष्य चिंतले. कॅम्पस मॅनेजर डॉक्टर श्री मोहनराव बुके यांनी प्रास्ताविक केले तर प्रा. श्री भोसले यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास सर्व प्राध्यापक शहरातील इंजिनियर्स व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विलासराव देशमुख फाऊंडेशनचा अभिनव उपक्रम; १३० महिलांचा सहभाग

## ‘खेळ पैठणीचा’ स्पर्धेच्या विजेत्या ठरल्या लता पाटील




**लातूर/प्रतिनिधी :** खास दिवाळीच्या निमित्ताने महिलांच्या कर्तृत्वाला नवी दिशा देण्यासाठी विलासराव देशमुख फाऊंडेशन, लातूरच्या वतीने दोन दिवसीय 'महिला उद्योजिका व्ही. डी. एफ. बाजार' चे आयोजन करण्यात आले आहे. याचा शुभारंभ दि. १४ रोजी झाला. सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत 'खेळ पैठणीचा' हा स्पर्धात्मक कार्यक्रम उत्साहात पार पडला. या स्पर्धेच्या प्रथम विजेत्या ठरल्या लता पाटील.

माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आणि ट्वेंटीवन ॲग्री लि.च्या संचालिका सौ. अदितीताई अमित देशमुख यांच्या संकल्पनेतून 'महिला उद्योजिका व्ही. डी. एफ. बाजार' हा उपक्रम साकारला आहे. दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर लातूर शहरातील व जिल्ह्यातील महिला बचत गटांच्या उद्योजिकांना मोठी व्यावसायिक संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. जिल्हा क्रीडा संकुल येथे आयोजित या बाजारात महिलांनी तयार केलेल्या गृह उपयोगी वस्तू, खाद्यपदार्थ, हस्तकला, मसाले, तयार कपडे आणि विविध प्रकारचे दिवाळी साहित्य यांचे भव्य प्रदर्शन व विक्री होत आहे.

या दरम्यान 'खेळ पैठणीचा'चे सुत्रधार प्रसाद मोटे यांनी खुप रंगतदारपणे हा कार्यक्रम रंगवला. यात १३० महिला सहभागी झाल्या होत्या. विविध खेळ, विविध प्रश्न, विविध स्पर्धांच्या माध्यमातून या कार्यक्रमाने महिलांचा उत्साह द्विगुणीत केला. या स्पर्धात्मक कार्यक्रमात प्रथम विजेत्या ठरल्या लता पाटील. याशिवाय रोहिणी क्षीरसागर, रुक्मिणी इंगोले, रंजना कलवले, अश्विनी खुडे या चार महिलांना उत्तेजनार्थ पारितोषीके देण्यात आली.

यावेळी संगीता मोळवणे, ॲड. सुनंदा मोटे, सोनाली थोरमोटे, प्रितम जाधव, अनुष्का बिराजदार यांची प्रमुख उपस्थिती होती.

# माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्याकडून पाटील कुटुंबाचे सांत्वन





**लातूर/प्रतिनिधी :** सुशीलादेवी देशमुख महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ अजय पाटील व विलास साखर कारखान्याचे संचालक नितीन पाटील यांचे वडील भाऊसाहेब पाटील यांचे वृद्धापकाळाने काही दिवसापूर्वी नुकतेच निधन झाले त्याबद्दल राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनी मंगळवारी लातूर तालुक्यातील पेठ येथील पाटील कुटुंबाचे सांत्वनपर भेट घेतली

यावेळी राज्य साखर महासंघाचे संचालक आबासाहेब पाटील जागृती शुगरचे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे सचिन दाताळ बालाजी साळुंखे हरिराम कुलकर्णी बालाजी वाघमारे सुहास पाटील, अरविंद पाटील शाम पाटील,शेषराव पाटील यांच्या सह ग्रामस्थ उपस्थित होते

### श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा

**लातूर/प्रतिनिधी :** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात दि.१५ ऑक्टोबर २०२५ बुधवार रोजी महान शास्त्रज्ञ, भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी मंचावर विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, धनंजय कुलकर्णी, अभ्यासपूरक मंडळ प्रमुख रेणुका गिरी, विज्ञान मंडळ प्रमुख अनुपमा पाटील, कार्यक्रम प्रमुख श्याम अंदुरे, चि. प्रणव फड यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते सरस्वती माता व डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी विषय मांडणी करताना चि. प्रणव फड (दहावी फ) याने डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांचे जीवन कार्य व वाचनाचे महत्त्व सांगितले. वाचन आपल्या जीवनात अनेक सकारात्मक बदल घडवून आणते असे सांगितले.

# आंतरराष्ट्रीय आपत्ती धोका कमी दिनानिमित्त अंध विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण

**लातूर/प्रतिनिधी :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ उपकेंद्र, लातूर येथील व्यवस्थापन शास्त्र संकुलाच्या विद्यार्थ्यांनी दिनांक १३ ऑक्टोबर २०२५ रोजी ''आंतरराष्ट्रीय आपत्ती धोका कमी दिन'' (International Disaster Risk Reduction Day) बुधोडा येथील स्वाधार आश्रमातील अंध विद्यार्थ्यांसोबत साजरा केला. या विशेष उपक्रमात अंध विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यात आले. भूकंप, आग आणि वीज पडणे यांसारख्या नैसर्गिक आपत्तींच्या वेळी योग्य प्रतिसाद आणि सुरक्षिततेची उपाययोजना याविषयी डॉ. प्रमोद पाटील यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे आयोजन उपकेंद्र संचालक डॉ. राजेश शिंदे आणि व्यवस्थापन शास्त्र संकुलाचे संचालक डॉ. संभाजी माने यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमानंतर उपकेंद्रातील विद्यार्थ्यांनी दीपावली फराळाचे वाटप केले. या प्रसंगी बोलत असताना डॉ. प्रमोद पाटील म्हणाले, दृष्टी नसली तरी उर्वरित इंद्रियांच्या आधारावर अंध व्यक्ती सभोवतालच्या निसर्गासोबत समन्वय साधून सहावे इंद्रिय तयार करतात आणि आपत्तीला तोंड देतात. अंध व अपंग व्यक्ती नेहमी सतर्क भूमिकेत असल्याकारणाने आपत्तीचे भाकीत आणि पूर्वतयारी चांगल्या पद्धतीने करू



शकतात.'' कार्यक्रमाच्या शेवटी स्वाधार संस्थेचे संचालक हरिश्चंद्र सुडे यांनी सर्व विद्यार्थ्यांना दीपावलीच्या हार्दिक शुभेछया दिल्या व आभार मानले.

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGE MY NAME FROM **GAIKWAD BABRUWAHAN RUSTUMRAO TO BABRUVAN RUSTUM GAIKWAD** HENCE FROTH THIS DECLERATION AND WILL BE KNOWN BY THIS NAME I WILL USE **BABRUVAN RUSTUM GAIKWAD** IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY WIFE CHILDREN AND FAMILY.
**OLD NAME : GAIKWAD BABRUWAHAN RUSTUMRAO**
**NEW NAME : BABRUVAN RUSTUM GAIKWAD**
**ADDRESS : AT-SAUNDANAAMBA,TQ-KALAMB, DIST-OSMANABAD**

# रेणापूर येथील विविध विकास कामासाठी ५ कोटीचा निधी आ. रमेशअप्पा कराड यांच्या प्रयत्नातून मंजूर



**लातूर/प्रतिनिधी :** रेणापूर येथे खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी तीन कोटी रुपये खर्चाचे इंनडोअर स्टेडियम यासह इतर विकास कामासाठी लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत तब्बल पाच कोटी रुपयांचा निधी नुकताच मंजूर झाला आहे सदरील निधी मंजूर झाल्याने रेणापूरच्या विकासात मोठी भर पडणार आहे.

भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वात रेणापूर नगरपंचायत भाजपाच्या ताब्यात आल्यापासून राज्यातील महायुती शासनाच्या माध्यमातून रेणापूर येथे नवीन पाणीपुरवठा योजना, श्री रेणुका देवी मंदिर भक्तनिवास, अशोक सम्राट बौद्ध विहार, मुस्लिम बांधवांसाठी शादीखाना, बालाजी मंदिर परिसरात भव्य सभागृह, रेणा नदीवर घाट विकसित करणे, श्री रेणुका देवी मंदिर परिसर विकासीत करणे, अहिल्यादेवी होळकर समाज मंदिर, रेड्डी समाज भवन, हनुमान मंदिर सभागृह, अंतर्गत सिमेंट रस्ते, नाली बांधकाम, पथदिवे, अंगणवाडी बांधकाम यासह विविध कामासाठी कोट्यावधी रुपयाचा निधी आ. रमेशआप्पा कराड यांनी उपलब्ध करून दिला आहे. यातील काही कामे झाली आहेत तर काही कामे प्रगतीपथावर आहेत इतर उर्वरित कामाला येत्या काही दिवसात प्रत्यक्ष सुरुवात होणार आहे.

रेणापूर शहराच्या इतिहासात पहिल्यांदाच एवढा मोठ्याप्रमाणात आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून निधी प्राप्त झाल्याने सर्वांगीण विकासाला गती मिळाली. रेणापूर शहरातील उर्वरित इतरही विकास कामाला निधी मिळावा यासाठी राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस साहेब आणि राज्याचे नगरविकास मंत्री तथा उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे साहेब यांच्याकडे भाजपाचे नेते आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला केलेल्या पाठपुराव्यामुळे रेणापूर येथे तीन कोटी रुपये खर्चाचे इंदोर क्रीडा संकुलन विकसित करणे, वाचनालय विकसित करण्यासाठी एक कोटी आणि बालाजी मंदिर येथील सभागृहाच्या उर्वरित बांधकामासाठी एक कोटी रुपये असे एकूण पाच कोटी रुपयांचा निधी राज्याच्या नगरविकास विभागाने वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून १४ ऑक्टोबर २५ रोजीच्या शासन निर्णय पत्रकांन्वये मंजूर केला आहे.

रेणापूर शहराच्या विकास कामासाठी पाच कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल भाजपाचे नेते आमदार श्री रमेशआप्पा कराड यांचे प्रथम नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, माजी नगराध्यक्षा आरती राठोड, भाजपाचे चंद्रकांत कातळे, सुधीर तोडकरी, श्रीकृष्ण मोटेगावकर, दत्ता सरवदे, अच्युत कातळे, दिनकर राठोड, विजय चव्हाण, गणेश चव्हाण, शेख अजीम, दिलीप आकनगिरे, उत्तम चव्हाण, राजकुमार आलापुरे, उज्वल कांबळे, महेश गाडे, अंतराम चव्हाण, मारूफ आत्तार, उत्तम घोडके, रमा चव्हाण, लखन आवळे, हनुमंत अकनगिरे, धम्मानंद घोडके, संतोष राठोड, अंकुश मोटेगावकर, दिलीप चव्हाण, सोपान सातपुते, संजय वीरुळे, हनुमंत भालेराव, अमृतेश्वर स्वामी, महेश वरवटे, हरी भोळे, नंदकुमार बड़े, शेख सलीम, शेख मकसूद, रफिक शिकलकर, शरद चक्रे, हरी पांचाळ, मनोज चक्रे, सुभाष राठोड, सचिन शिरसकर, सुरज फुलारी, दत्ता कातळे, महेश मदने, टिकू दळवी, शिवाजी भावे, विकी राजे, ज्ञानोबा सातपुते,आवेश कुरेशी, शेषराव पवार, परमेश्वर राठोड, समीर माने, गणेश भोकरे, अर्जुन सूर्यवंशी, रोहित खुमसे, पप्पू कुडके यांच्यासह भाजपाचे कार्यकर्ते लोकप्रतिनिधी पदाधिकारी यांनी आभार व्यक्त केले आहेत.

निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
**सितारी विमा सेवा केंद्र**
द.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
**जमीरोद्दीन सितारी**
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396

### अंध कोण ..

शाप आहे अंधपणा
अंधश्रध्दा का मना
छान सृष्टी पहायची
त्यांची मनो कामना

अंधत्व शिक्षा आहे
नको असा उणेपणा
येऊ शकते उद्याला
वेळअसली आपणा

सर्वगुणी आहे कुणी
न्याहाळा रुप दर्पणा
कृती उक्ती दोन्हीत
असावा डोळसपणा

करतआले सदोदित
काळोखाशी सामना
दिव्यांग शक्ती शाली
जाणा तया उपासना

नाही हो आदिमानव
विसरा जुन्या खुणा
रे पुरोगामी शतकात
विचाराचा मुक्तपणा

नेत्रदान उपाय भला
सुख देई कितीजणां
पुण्य कर्म जाण मर्म
मुक्त हो अल्प ऋणा

दृष्टीहीन हो कष्टहीन
महत्व मोठे नेत्रदाना
दूर दर्शी हे आवाहन
नेत्रदाना पुढे या ना

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

# कठीण गोष्टी आधी करा म्हणजे बाकी सर्व सोपे होते: सतीश थोकाडे




**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद शिक्षण संस्थेच्या दयानंद कला महाविद्यालयातील ॲनिमेशन विभाग आणि अभिजात फिल्म सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कॅरेक्टर डिझाईन फ्रॉम स्केच टू सोल या विषयावर झालेल्या या कार्यशाळेसाठी मुंबई येथील ओवरसी ॲनिमेशन कंपनीचे डायरेक्टर व क्रिएटिव्ह डायरेक्टर श्री. सतीश थोकाडे हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते.

अवघड गोष्टी आधी करा म्हणजे बाकी सर्व गोष्टी सोप्या वाटतील, असा प्रेरणादायी संदेश देत त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आपल्या कारकिर्दीतील अनुभव सांगताना थोकाडे यांनी स्केचिंग करताना कन्सेप्ट ड्रॉइंग वर भर देण्याचे आणि वास्तव ओळखण्याचे महत्त्व पटवून दिले. तसेच, लातूरसारख्या शहरात ॲनिमेशनचा अभ्यासक्रम उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांनी संस्थेचे अभिनंदन करत विद्यार्थ्यांना या संधीचा पुरेपूर फायदा घ्यावा, असे आवाहन केले. दयानंद कला महाविद्यालयातील ॲनिमेशन विभागामध्ये दोन दिवसीय कार्यशाळा दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीरमणजी लाहोटी व श्री. सचिव श्री.रमेश बियाणी यांच्या प्रेरणा आणि संकल्पनेतुन संपन्न झाली. या प्रसंगी अकॅडमी कौन्सिल सदस्य श्री. रविंद्रजी होरा यांनी विद्यार्थ्यांना प्रत्येक काम अधिक चांगले करण्याचा प्रयत्न करावा, असे सांगितले. तर श्री. चैतन्यजी भार्गव यांनी स्वतःला सतत अपडेट ठेवा आणि प्रत्येक संधीसाठी तयार राहा, असा सल्ला दिला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी कामालाच तुमची आवड बनवा, तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यास करिअर नक्कीच उज्वल होते, असे सांगितले. त्यांनी ॲनिमेशनचा वास्तव जीवनातील उपयोग उदाहरणासहित स्पष्ट केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲनिमेशन विभाग प्रमुख डॉ. दुर्गा शर्मा यांनी केले. त्यांनी विभागातील माजी विद्यार्थ्यांची प्रगती व कार्यक्षेत्रातील वाटचाल मांडली तसेच प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. या कार्यक्रमासाठी अभिजात फिल्म सोसायटीचे अध्यक्ष श्री जितेंद्र पाटील, सचिव डॉ स्वप्निल देशमुख, कोषाध्यक्ष धनंजय कुलकर्णी, प्रथमेश जाधव, आदित्य कुलकर्णी, आधी उपस्थित होते यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अथक प्रयत्न केले. आभार प्रदर्शन प्रा. संतोष काकडे यांनी केले तर सूत्रसंचालन कुमारी क्रांती वाघमारे यांनी केले.

या वेळी उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, कनिष्ठ महाविद्यालय उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, प्रा. इरफान शेख, प्रा. सचिन पतंगे, प्रा. पूजा खोंडे, श्रीमती अंजली धर्माधिकारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**सिग्नलिंग काम**
**निविदा सूचना क्रमांक. SUR-N-T-2025-26-18**
**तारीख:** १३.१०.२०२५ डीआरएम (एस अँड टी) यांचे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने रॉलवेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट **www.ireps.gov.in** वर खालील कामांसाठी सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या / कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवीत आहेत: **परिसरासह कामाचे नाव:** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील आरआरआय सोलापूरमध्ये सामान्य शोध संकेत रिले/रिव्हर्स शोध संकेत रिले (एनकेआर/आरकेआर) सर्किटची तरतूद. **कामाची अंदाजे किंमत:** रु. १,२९,६९,९७२.१७. **निविदा फॉर्मची किंमत:** शून्य. **जमा करावयाची बयाणा रक्कम:** रु. २,१४,९००/-. **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** १२ महिने. **निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ:** ०४.११.२०२५ रोजी १५:३० वा. तपशील ireps वेबसाइटवर उपलब्ध आहेत. जर काही सुधारणा/शुद्धीकरणे असतील तर ती फक्त वरील ई-प्रोक्योरमेंट वेबसाइटवर अपलोड केली जातील. फक्त ऑनलाइन निविदा स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/पोस्टल/ई-मेल, फॅक्स, हस्तलिखित निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. बोलीदारांना कंपनीच्या नावासह वर्ग III डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र मिळवण्याची आणि **www.ireps.gov.in** वर नोंदणी करण्याची विनंती केली जाते. अर्नेस्ट मनी (EMD) पेमेंट फक्त नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे स्वीकारले जाईल. अधिक माहितीसाठी कृपया **www.ireps.gov.in** ला भेट द्या.
**डीआरएम (एस अँड टी शाखा)**
**मध्य रेल्वे, सोलापूर**
APEX-74
टिकट के लिए यूटीएस ऐप डाउनलोड करें

टोनर रिफिलिंग

फक्त ₹ ३००/-
मास्टर प्लेट
प्रिंटिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६